# ॥ चैतन्य लहरी ॥

सन १९९५-९६ क्र. ३ व ४



तुमचे हे ईश्वराने दिलेलं हृदय अत्यंत उदार, धार्मिकतेने भरलेलं आहे. या देणगीचा तुम्ही आदर केला पाहिजे. त्याबद्दल अभिमान वाटायला हवा. त्याचा आनंद घेतला पाहिजे.

- श्री माताजी निर्मला देवी

सहस्रार दिन, कबेला, इटली ७ मे ९५

# सहस्त्रार पूजेच्या दिवशी केलेल्या भाषणाचा सारांश

## कबेला, इटली ७ मे १९९५

आजचा दिवस सहजयोग्यांकरिता विशेष आहे. कारण या दिवशी सहस्त्रार उघडले गेले. तो एक चमत्कार होता. त्यावेळी ते घडावे असे मला वाटत नव्हते. म्हणून मी थांबणार होते पण काहितरी घडले व ते उघडावे असा विचार करणे मला भाग पडले. कारण त्या वेळी जी परिस्थिती होती त्यानुसार थोडाही उशीर होऊ नये असे मला वाटले. जर उशीर झाला तर खोटारडे गुरुं आपल्या मुर्खपणाच्या गोष्टी समाजात पसरवतील.

आता २५ वर्षे पूर्ण झाली. यावेळी तुम्ही सर्व येथे जमला आहात. ज्यांनी बरेच काही मिळविले आहे, प्राप्त केले आहे असे बरेच जण आहेत पण ते आता येथे नाहीत. खऱ्या अर्थाने तुम्ही काय मिळवीले याची तुम्हाला जाणीव नाही तुम्हाला चैतन्य प्राप्त झाले आहे. सर्वत्र अस्तित्वात असलेले परमचैतन्य तुम्हाला जाणवते. तुम्ही आनंदाच्या सागरांत डुंबत अहांत. तुम्ही सामुहिकतेचा आनंद लुटत आहात. तुम्ही तुमच्या मर्यादांच्या पलीकडे गेले आहात. तुमच्या बाबतीत हे घडते कारण हे मिळवणे हा तुमचा हक्क आहे. याचे श्रेय मी माझ्याकडे घेत नाही. मी सदोदीत एकच एक गोष्ट तुमच्या निदर्शनांस आणते की तुम्ही परमेश्वरांच्या साम्राज्यात उतरला आहात आता त्याची मजा लुटा.

आपल्या सभोवार दृष्टी टाकली तर दिसते कीं सर्व निसर्ग आपल्याच आनंदात आहे. त्याला कशाचीच तमा नाही. त्याला साक्षात्कार मिळालेला नाही. त्यांना परमचैतन्य समजत नाही पण आनंद लुटायचा समजत. हे त्यांना कसे कळते ? फुले उमलतात व काही काळाने गळून पडतात. पण जो पर्यंत ती असतात तो पर्यंत ती आनंदात असतात. ते भूत वा भविष्याचा विचार कधीही करत नाहीत ते वर्तमानांत आनंद लुटतात, व आपल्या सुगंधाचा आनंद दुसऱ्याला देतात. त्यांना सौंदर्य आहे व ते दुसऱ्यासाठी आहे. एकूण निसर्गच असा आहे. आपण पक्षांकडे पाहतो किंवा असेच दुसरे काही, ज्याला आपण निसर्ग म्हणतो ते सर्व काही जणू ध्यानावस्थेत असून जे सर्व काही घडते आहे त्या सर्वाला ते साक्षी आहेत, जसे हे मोठ मोठे पर्वत, टेकड्या.

आता आपण अत्तापर्यंत काम मिळवले हे पाहू या. हे महत्त्वाचे आहे कारण तुम्ही एकादा डोंगर चढता व वळून मागे पाहता, तेव्हा तुम्हाला धक्का बसतो आणि कदाचित तुम्ही खाली घसरण्याची शक्यता असते. सामान्यतः लोक म्हणतात मागे वळून बघू नये. समजा एखाद्या माणसाने खूप संपत्ती मिळविली तर तो अधून मधून उघडून त्याची मोजणी करतो व काय प्राप्ती झाली हे पाहतो. आणि प्रत्येक वेळी त्याला मजा वाटत असते. आपण सापेक्षतेने काय मिळविले आणि कसे प्राप्त केले हे बघून त्याची मानसिक शक्ति वाढते व जीवनात तृप्तता वाढते.

प्रथमतः तुमच्यात घटीत झालेली महत्त्वाची गोष्ट



अंक उशीरा निघाल्याबद्दल दिलगीर आहोत

म्हणजे तुम्हाला झालेली परमचैतन्याची जाणीव. याचा अर्थ तुम्ही कळकळीचे सूज्ञ व प्रामाणिक असे सत्य शोधणारे साधक आहात केवळ माझ्या कार्यक्रमाला आलात. चैतन्याची जाणीव झाली आणि त्यात स्थिर होत गेलात. या एकदम झालेल्या जाणीवेने तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसला. हे खरे आहे की नाही याची तुम्ही परीक्षा घेत होता. पण तुम्हाला खात्री होती आणि जीवनाला नवी दिशा मिळाली. व तसेच ईश्वरी प्रेमाच्या परमचैतन्याची जाणीव झाली, हे समजले. यातील गम्य म्हणजे तुम्हाला पूर्ण स्वतंत्रता मिळाली. तुम्हाला स्वतःची स्वतंत्रता प्राप्त झाली.

प्रथम तुम्हाला मुक्तता मिळाली ती अहंकारापासून अहंकाराची ही भिंत तुम्ही पार केली. या अहंकाराच्या बंधनातून तुम्ही मुक्त झाला, जो तुम्हाला नेहमी तुमच्या समोर अनेक प्रश्न उभे करत होता. अशा अनेक गोष्टी अहंकार करत असतो. त्याची तुम्हाला कल्पना नाही. जर माणूस अहंकारी असेल तर तो कोणालाही सहजपणे दुखावू शकतो. पण त्याला स्वतःला दुखावले तर त्याला ते आवडत नाही. आणि त्याला तो लगेच ओरडू लागतो. मुख्यतः जे स्वतः अहंकारी असतात ते लगेच दुखावतात. पण ते स्वतः समजू शकत नाही की त्यांनी किती लोकांना दुखावले आणि कित्येक लोक त्यांना भिऊन असतात. कुठल्याही माणसाला विनाकारण दुखावणे हे पाप आहे. मग ते कुठलेही कारण असो तुम्ही दुसऱ्याला दुखवणे योग्य नाही.

पहिली गोष्ट म्हणजे सूड एखाद्याने तुम्हाला दुखवले असेल किंवा तुमच्या बरोबर चुकीची वागणूक केली असेल, तर तेथे सूडाची भावना असते. तुमच्या प्रतिक्रियेतून सूडाची कल्पना उद्भवते. काहींची प्रतिक्रिया क्षुब्ध असते. या सूडातून एकमेकांचे खूनही होतात. या जगात सूड ही एक वेडेपणाची कल्पना आहे. अगदी खोलात जाऊन विचार केला तर तुम्ही काय आणि कसला सूड घेता ? समजा, एखाद्या व्यक्तिने तुम्हाला यातना दिल्या, आणि तुम्ही रागात त्याला ठार केले, म्हणजे खरे तर त्याला तुम्ही वाचविलेत. अगदी काही कष्ट न घेता त्याला सुटका मिळाली. हा कसला सूड ! दुसऱ्यास ठार मारण्याच्या कल्पनेपासून दूर राहणे हाच खरे तर सूड म्हणता येईल.दुसऱ्यावर सूड घेणे म्हणजेच खरा बदला घेणे होय असे आपण समजतो हे चुकीचे आहे कारण ही सूडाची क्रिया तुमची तुमच्याकडे परत येते, व तुम्हाला अधिक सलते.

देवाच्या नावाने सुद्धा बदला घेण्याचा प्रकार चालू आहे. एखाद्या धर्माला अनुसरून वागणे वा आपल्या मनाविरुद्ध एखादे कृत्य करणे म्हणूनही बदला घेतला जातो. तुम्ही कसला बदला घेता हे सुद्धा ज्याला कळत नाही अशा लोकांना तुम्ही ठार मारता, त्यांचा शेवट करता. लोक बाँब उडवतात त्यात हजारो निष्पाप लोक बळी पडतात, हा कसला सूडाचा प्रकार ? त्यात त्यांची काहीच चूक नसते. तेव्हा अशा सूडातून जो उद्रेक होतो. त्यात अनेक निष्पाप बळी पडतात. त्याची प्रतिक्रिया तुमच्यावर उलटणारच. तुमची त्यातून सुटका नाही. ती एक दीर्घकाळची प्रक्रिया आहे. बर्म्यूडा ट्रँगलबाबत म्हणतात. अनेक निग्रोंना गुलाम करण्यात आले व बरेच बुडून मेले. त्यांचे आत्मे तेथून जाणाऱ्या लोकांचा पिच्छा पुरवतात व बुडवून टाकतात. सूडाच्या प्रत्येक क्रियेला प्रतिक्रिया असतेच. तर या सूडाच्या कल्पनेतून तुम्ही अनेक लोकांनी बाहेर पडायला हवे. पण याच्याही पलिकडे तुम्ही सूड न घेता ते ईश्वरावर सोपविले तर ते घडते व ईश्वर त्याचा ताबा आपल्याकडे घेऊन त्यांना योग्य धडा देतो. मग ती कुठलीही जात असो वा संस्था असो. त्याबाबत तुम्हाला चिंता करावी लागत नाही.

गेली २५ वर्षे मी पाहते आहे. काही लोकांनी मला फार सतावले आहे. काहि धार्मिक संस्थानिही माझ्या विरुद्ध बरेच काही केले. प्रचारमाध्यमे माझ्या विरुद्ध होती. उदा. काही फ्रेंच पत्रकारानी आम्हाला त्रास देण्याचा प्रयत्न केला. काही हरकत नाही. जे तीन लोक भारतात आले होते त्यांच्या विरुद्ध पकड वॉरंट काढण्यात आले. ते जर भारतात गेले तर त्यांना अटक होईल. मी काहीच केले नाही. दुसरे म्हणजे

ही वृत्तपत्रे बंद पडली. आम्ही कसलाही बदला घेतला नाही. कशा करता ? आम्हाला काय त्रास झाला त्याची आम्ही कधीच पर्वा केली नाही. पण कायदेशिररित्या ते इतके अडकले की त्याच्यावरच पकड वॉरंट काढले गेले. व पुन्हा जर भारतात गेले तर अटक होईल अशी अवस्था झाली. फ्रेंच सरकारचाही पूर्ण पाठिंवा असूनही व सर्व प्रयत्न करुनही त्यांच्यावर टांगती तलवार आहेतच. अगदी आयुष्यभर अगदी मरेपर्यंत.

क्षमा शिलतेने सर्व काही घडून येते व दुसरा माणूस आपल्या योग्य मार्गावर येतो. दुसऱ्या बद्दलची आकसाची भावना जर टाकली तर तुम्हाला एकदम शांत वाटते. मी तुमच्यातील शांतता आहे. त्यात अनैसर्गिक असे काहींच नाही. पण ते सहज घडते. सर्व गोष्टी सहजपणे घडून येतात. इंग्लडमधील एका मुलाने तुर्कस्थानमध्ये जाऊन सहजयोगा विरुद्ध वर्तमान पत्रांना खोटे काही सांगितले त्याला प्रसिद्धी दिली गेली. पण शेवटी त्या मुलाने टी.व्ही.वर बोलताना कबूल केले की मी जे बोलले ते सर्व खोटे होते. कोणीही त्याला जाऊन सांगीतले नाही. व लिहीलेही नाही. सूडाच्या कुठल्याही घोटाळ्यात अडकू नये. हे तुमच्या दृष्टीने समजून घेतले पाहिजे. कारण तुम्ही ईश्वराच्या साम्राज्यात आहात. ईश्वरी शासन हे तत्पर, अगदी प्रमाणिक व कार्यक्षम शासन आहे. तुमच्या बाबतीत तुम्ही ईश्वरी साम्राज्याचे नागरिक आहात, जेथे तुम्ही अगदी सुरक्षित आहांत. जो माणूस सुरक्षित आहे तो कधीही घावरत नाही. तुम्हालाही भिती पासून मुक्तता मिळाली आहे. मला समजत नाही, तुम्हाला कसली भिती आहे, प्रकृती, कुटुंबाची मुले वा घराची. सहजयोग्यांना कसलीही काळजी नसते. सर्व काही सहज घडून येते. मग कशाला चिंता करायची ? चिंतेची बाबच अस्तित्वात नाही. ती संपली आहे. तुम्ही अशा परिस्थितीत आहात की चिंता करण्यास वेळच नाही. कारण तुम्ही स्वतःच्याच आनंदात आहात.

काही लोकाना सततभय वाटते व त्या भयातूनच ते रोगांना बळी पडतात. विशेषतः डाव्या बाजूचे घावरण्यासारखे काय आहे. साप समजून भुई झोडपण्यासारखे आहे. (साप नसताना) अश्या तऱ्हेने तुम्ही समजून घ्या व पुढे जा. भुते किंवा राक्षस कुठेतरी उभे आहेत अशी काल्पनिक भिती बाळगणे वेडगळ पणा आहे. तुमच्या करता हे अस्तित्वात नाही. तुम्ही अंधारात चालत असता आणि आकृती दिसते, प्रत्यक्षात ती नसतेच. पण केवळ भितीमुळेच माणूस असा विचार करुं लागतो. त्यामुळे तो आपली स्वतंत्रता गमावतो आणि अनेक लोकांचा गुलाम होतो. अमका तमका माणूस मला त्रास देईल, इजा करेल याचे त्याला सतत भयवाटत राहते.

अशा पोकळ भितीमुळे कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त होते. समजा पत्निचे वर्चस्व असले अथवा पति आक्रमक असतो तरी घावरण्याचे कारण नाही. भितीमुळेच ते त्यांच्या कह्यात जातात. समजा एखादी पत्नि वर्चस्व दाखवित असेल तर गमतीने तीची टर उडवणे चांगले. किंवा या उलट एकमेकांची गंमत करुन त्यांना सरळ सरळ सांगून टाका कीं हा तुमचा विशेष गुण टाकून द्या. भिती सोडा. पती पासून किंवा पत्नि पासून घावरण्यासारखे काय आहे. तो किंवा ती फारतर काय करेल, ठार मारेल. हरकत नाही तुम्हाला केव्हां तरी मरण येणारच आहे.

मृत्युबाबत भय बाळगणे ही एक निरर्थक बाब आहे. आता तुम्ही जिवंत आहात तर मृत्युबाबत मला कशाला विचारता ? ते जाणण्याची काय आवश्यकता आहे ? आता व आजच्याबाबत मी तुम्हाला सांगू शकेन. मरणाबाबत व नंतर काय होणार ते जाणून घ्यायचे हा एक वेडेपणाचाच प्रकार होय. तुम्हाला मरण आले, तुम्ही संपता त्यानंतर तुम्हाला काही एक करायचे नाही. मग तुम्ही केव्हा मरणार हे जाणण्यात काय स्वारस्य ? किंवा नंतर काय होणार इ. जे काय घडायचे ते घडणारच. तुम्ही झोपता नंतर काय घडणार हे कधीच विचारत नाही.

तुमची मृत्यूची वेळ ठरलेली आहे. त्याचवेळी तुम्ही

मरणार. ज्याला जन्म आहे, त्याला मृत्यू आहेच. पण तुम्हाला अनंत जीवन लाभेल हे तुम्हास ठाऊक नाही. तुम्ही अमर आहात. शरीर नाहिसे होणे म्हणजे मृत्यू नाही. ज्यावेळी तुमच्या आत्म्यावरील तावा जातो तेच मरण होय. एकदा तुम्ही आत्मसाक्षात्कारी झालात, तुम्हाला पूर्ण शक्ती व आत्म्यावर तावा प्राप्त होतो. व पुनःजन्म घेणे वा जरूर नसेल तर जन्म न घेणे हे तुमच्यावर अवलंबून आहे. अनेकानेक आत्मे मला माहित आहेत की त्यांनी धडाडीने खालावत जाणाऱ्या समाजात जन्म घेतला व ते आपल्या मूर्खपणामुळे विनाश पावणार तर मृत्यू बद्दलची ही भितीयुक्त जाणीवही सहजयोग्यांच्या बाबतीत मूर्ख कल्पना आहे, मृत्यूबाबत विचार करण्याजोगे काय आहे ? तुमच्याबाबतीत मरण वगैरे काही नाही, कारण तुम्हाला अनंत जीवन प्राप्त झालेले आहे. तुम्ही याच देहाबरोबर रहाणार असे नाही. जसे आपण आपले पोषाख बदलता, व परत कार्यरत होता, हेही जाणता. तसेच हा देह जरी नसला तरी सहजयोगाच्या कार्यासाठी हजर असता किंवा सत्याच्या नावावर जे कार्य करायचे त्यासाठी तुम्हाला तुमच्या अमरत्वाची जाणीव असावी. तुमचे कार्य काय ? तुमच्या कल्पना काय आणि काय करावयाचे आहे ? तर या मरणाच्या विचारातून बाहेर पडा. कारण तुम्हाला मरणच नाही. कळले ?

ज्या लोकांना मृत्यूचे भय वाटते असे लोक विमा उतरवतात, इतर काही तरतुदी करतात, पण ही सर्व डोके दुखीच सरते शेवटी ह्या सर्व भौतिक गोष्टी येथेच सोडून जावे लागते. मरतेवेळी कोणताही आत्मा एक कणभर माती सुद्धा बरोबर नेऊ शकत नाही. परंतु तुमच्या बाबतीत तुम्हाला भौतिक गोष्टीत स्वारस्य नसल्यामुळे व त्या तुम्ही अगोदरच सोडल्यामुळे बरोबर नेण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तुम्ही बाह्यात अडकलेले नसल्याने तुमचा आत्मा मुक्त असतो. जेव्हा तुम्ही मृत्यू पावता त्यावेळी तुम्ही सहजपणे मुक्त होता. व नंतर तुम्हाला पूर्ण स्वांतत्र्य जाणवते. आणि तुम्हाला काय करायचे आहे ते तुम्ही ठरवू शकता. हे सर्व स्वतःच्या मर्जीप्रमाणे व इच्छेप्रमाणे घटीत होते. तुम्ही स्वतःच्या देहातून बाहेर आला आहात असे तुम्हाला जाणवत नाही, तुम्हाला मृत्युचे भय नसावे.उलट मृत्यूचे स्वागत करा कारण तुम्हाला त्यात जास्त स्वतंत्रता व जास्त स्वास्थ जाणवेल. या जगातील शरीर धारण करणाऱ्यांना जे प्रश्न वहावे लागतात ते तुम्हाला नसतील.

जेव्हा तुम्ही पूर्णपणे धुतले जाता, स्वच्छ होता, पूर्वग्रहांपासून तुमचे मनसुद्धा स्वच्छ होऊन जाते; तेव्हा तुम्ही एक सुंदर आरसाच बनता. त्यात तुम्ही ज्या समाजात वावरता त्याचे पूर्ण प्रतिबिंब दिसते. तुमच्यावर पूर्ण सत्ता असणाऱ्या शासनाचे त्यांत चित्र दिसते. सर्व काही स्वच्छ. एखाद्याने तुम्हाला विचारले, तुमचे राजकारण काय ? मी म्हणेन, कुठलेच राजकारण नाही हेच राजकारण. ते म्हणतील, तुम्हाला राजकारण माहीत नाही. त्याच्याशिवाय तुम्ही कसे राहू शकाल ? ज्यांच्याशी काही संबंध नाही असे अनेक प्रश्न विचारीत राहतील. पण साक्षात्कारी आत्म्याच्या बाबतीत सर्व उलटेच साक्षात्कारी आत्मा पहातो व सर्व काही स्वच्छ दर्शवतो. आपल्या देशाच्या व ज्या समाजात रहातात त्याविषयी लोकांनी (सहजयोग्यांनी) जी आस्था दाखविली ती पाहून मी चकितच झाले. आपली ओळखही पूर्णपणे हरवून जाते. तसे काही दाखवावे असे त्यांना वाटत नाही. तुम्ही कुठे चुकते ते पाहता. त्यास कसे सहाय्य करावे, काय करावे, कसे घडवून आणावे या गोष्टींचे महत्त्व तुम्हाला वाटते. तुम्ही काल सर्व देशांचे ध्वज आणले होते. याच्यामागे तुम्हाला या देशात शांतता रहावी अशीच तुमची भावना आहे. सहजयोगातून तेथे आनंद, शांतता त्यांना मिळावी. काय सुंदर विचार आहेत. तुम्ही सहजयोगात येता व एका कोपऱ्यात बसून असता, असे नाही. अप्रत्यक्षपणे दुसऱ्या देशाकरिता ते घडवून आणावे असे वाटते. प्रत्यक्षपणे एका खोल विचारातून ते घडवून आणावे, ठीक करावे असे वाटते. यातून निराळ्याच प्रकारचे व्यक्तिमत्त्व तुमच्यात निर्माण होते.

एखाद्याला तुम्ही सांगता कि मला हे का आवडते ? हे करण्याची जरुरी काय ? नाही मला या समाजातच रहायचे आहे आणि मला वाटते तेच करावे असे नाही. पण ज्या वेळी तुम्ही आत्मसाक्षात्कारी होता तेव्हा तुम्हाला जे आवडते तेच करा. तुम्ही जे कार्य कराल ते पवित्र असेल, चांगले असेल, रचनात्मक असेल व फायदेशीर असेल. आत्मसाक्षात्कारानंतर तुम्हाला कसलीही आडकाठी नाही. नको नकोचीही आडकाठी तुम्हाला गुलामीत ढकलते. पण आत्मसाक्षात्कारानंतर तुम्ही पक्षासारखे मुक्त असता कोणाच्या गुलामीत अडकत नाही. उदा. काही धर्मोपदेशक सांगतात तुम्ही मद्य पिऊ नका, धुम्रपान करु नका, नशिले पदार्थ घेऊ नका हे करु नका ते करुं नका पण त्याने काही थांबत नाही त्याचा उपयोग पण होत नाही. झगडून, सर्व प्रयत्न करुनही लोक आत्महत्या करतात पण सवयी सुटत नाहीत. तुम्ही इतके समर्थ अहांत, की तुम्हाला कसलीही गोष्ट चिकटत नाही. तुमच्या चारित्र्याची पवित्रता उफाळून वर आलेली आहे ती कोणत्याही निरर्थक गोष्टी तुम्हाला चिकटू देत नाही. बऱ्याच सहज योग्यांनी मला सांगितले की ते सहज योगात आल्यानंतर त्यांची दृष्टी स्थिरावली, ते सदाचरणी झाले ते पवित्र झाले हे कसे घडले हे त्यांना समजत नाही, म्हणून ते म्हणतात श्री माताजी तुम्ही तुमची पवित्रता आम्हाला दिली आहेत.

सहज योगात आल्यानंतर लोक आपापसात बोलत असतात व ते अनेक गोष्टींची गंमत करतात. उदा. एक सहजयोगी दुसऱ्यास म्हणतो आमच्यादेशात असे चालते, आणि असा मूर्खपणा चालू आहे. पण आमच्याकडे याच्याहि पलीकडे वरताण आहे असे दुसरा म्हणतो. अशा प्रकारची चढा ओढही सहजयोग्यांत पहावयास मिळते आणि म्हणून आपण पहायला पाहिजे किं आपण किती निर्मल आहोत व त्याला घातक व घाणेरडे असेल ते आपल्याला पसंत नाही. आम्ही आतुन धुतले जाऊन स्वच्छ झालो आहोत आणि असे काही आम्ही स्विकारणार नाही. लोक कसे करुणामय झाले आहेत. हे पण मी बघते आहे. ते एकमेकाबद्दल किती कळवळा दाखवतात हे पाहून मला आश्चर्य वाटते. उदा. दोन सहज योगी एकमेकावर नाराज होते. दुसरा सहजयोगी हा ठिक आहे हे पहिल्याला कसे समजवावे याचा मी विचार करीत होते. ते एकमेकांच्या दोषांवर नाराज होते त्यांची समजूत पटेना. मी त्याला म्हणाले ठिक आहे आता ध्यानात बैस ध्यान कर. मी विचारले तुझे माझ्यावर प्रेम आहे ना ? एक म्हणतो दुसऱ्या पेक्षा जास्त प्रेम आहे. मला एकंदरीत परिस्थिती कठीण वाटली. त्याना प्रेमाचे मोजमाप नसते हे मी कसे पटवून सांगावे ह्या विचारात होते. त्याचा काही तुम्ही आलेख काढू शकत नाही. ते तुमच्या आंत असते आणि एखाद्याला प्रेम दिले तर आनंद मिळतो. त्याला काही मोजमाप नाही. त्या दोघात हे बरेच दिवस चालले होते, आणि यासाठी काय करावे हे मी ठरवत होते. ते दोघे तसे जबाबदार होते तरी त्यांच्यात सामांजस्य होत नव्हते. मग ईश्वराला ते हातात घ्यावे लागले. त्या दोघांतील एक जण भयंकर आजारी पडला. मग दुसऱ्याला त्याच्या बद्दल एकदम करुणा उत्पन्न झाली, आपला विश्वास बसणार नाही पण दुसरा गृहस्थ त्या आजारी माणसाजवळ २४ तास बसून होता, आणि आर्थिक मदत करण्याची तयारीही त्याने दाखविली मुळांत तो समंजस व संवेदनाशिल होता, त्या मुळेच त्याच्यात प्रेम व करुणा निर्माण झाली. या ईश्वरी क्लृप्ती मुळे व करुणेने दोघे एवढे जवळ आले. तरही करुणेंची शक्ति खुप आहे. इतकी सुक्ष्म आहे की तुम्ही ती पाहू शकत नाही. कारण मी त्यांना (बाहेरुन) वैचारिक पातळीवर सांगत होते, समजावून शांत होण्यास सांगत होते पण ते व्यर्थ पण जेव्हा करुणामयी शक्ती जेव्हां एकावर कार्यरत झाली तेव्हा दुसऱ्याने ती करुणा पाहिली व मग ते खरे मित्र झाले.

प्रत्येकाला आपल्या आंत करुणा जाणवली पाहिजे. काही सहजयोग्याना मी ठीक करत असते सांगत असते तर मी बऱ्याच वेळेला पाहिले आहे की एखादा सहजयोगी म्हणेल माताजी त्याला क्षमा करु शकता का ? मी म्हणेन क्षमा केली.

मी काहीच केलेले नसते. 'कृपा करुन क्षमा करा माताजी' हे ऐकून ज्या वेळेला, सहजयोग्यांच्या बाबतीत - एका क्षणात एका दमात तुम्ही त्याला उचलून धरता त्या वेळी मी सुखावते. तुम्ही उदारतर आहातच पण दयाळूही आहात हे दिसून येते. तुमच्या हृदयांत या करुणेचा उगम आहे. तुम्ही तुमचे हृदय उघडा. तुमचे हृदय उघडले ते सहस्त्रार उघडण्यासारखेच आहे. मग तुम्ही क्षमाशील होता याचेच तुम्हाला आश्चर्य वाटते.

मला काही गोष्टी ऐकून उद्विग्न वाटते. तुम्ही आपले वेगळे गट निर्माण करता निरनिराळ्या आश्रमांचे, व ते एकत्र अथवा सामुहिकतेत येत नाहीत. मला त्यांची चिंता वाटते. त्यात एकच चुकते ते म्हणजे ह्या लोकांना असे वाटते. आपला कारभार अलग असावा आणि आपण सामुहिकते कश्याला हवे. हे पक्के की ह्या अशा लोकांनी ती करुणेची अवस्था अजून मिळविलेली नाही. एक जोडप आपापसात सतत भांडत असे. ते मला पत्रावर पत्र किंवा फोन करत काय करावे मला सुचेना वाटले त्यांनी घटस्फोट घ्यावा आणि संपवावे सगळे त्यांना मी एककटयाला भेटून घेण्यास सुचविले. व सांगीतले तुमच्या तक्रारी सोडविण्याच्या पलीकडच्या आहेत. मी तीला म्हटले तुझा नवराकधी घरात नसतो, माझ्या बरोबर कधी सोबत नसतो, आम्ही कधी बाहेर जात नाही अशी तुझी तक्रार आहे. तर नवरा म्हणतो की हीच मला नेहमी त्राग्याने मला बाहेर फिरायला न्या, हे करा, ते करा असे म्हणते. मी ते माझी इच्छा नसली तर करत नाही आणि मग ती रागावते. मी म्हणाले तुम्ही जर घटस्फोट घेतलात तर कसलीच तक्रार राहणार नाही. तुम्ही तुमच्या नवऱ्याला कायमच्या मुकणार मग हे सर्व करण्यांत काय अर्थ आहे. ही माझी अनुकंपा कार्य करु लागली. मग मी समजावले समजा उद्या तुमच्यापैकी एक जर आजारी पडला तर त्याची काळजी घ्यायला कोण आहे. तेव्हां त्यांचे डोळे उघडले. अशा या किरकोळ गोष्टींनी सुद्धा सहजयोग्यांच्या जीवनात बदल घडून त्यांचे एकदम हृदय उघडते, आणि एकमेकांपासून दूर राहण्याचा व सामुहितेपासून लांब राहण्याच्या क्षुल्लक कारणांचा ते त्याग करतात.

तुम्ही सर्वजण जेव्हा एकमेकाशी प्रेमाने वागता, एकमेकांची काळजी घेता, विनोद करता, नाच करता हे पाहून मला अतिशय आनंद होतो. हीच सगळ्यात महत्त्वाची गोष्ट ज्या पासून मला आनंद मिळतो. या सत्यतेच्या कल्पनेपासून मी दूर राहू इच्छित नाही कारण सहजयोगी असे वागू शकतात, ते दोन साक्षात्कारी आत्म्यात दुरावा किंवा अंतर निर्माण करु शकतात यावर सहज विश्वास ठेवणे मला कठीण जाते. जगात दोन साक्षात्कारी आत्मे एकमेकांचा आदरच ठेवतील. आदर व एकमेकांची काळजीच घेतील. नाहीतर दुसऱ्या साक्षात्कारी व्यक्ति विरुद्ध वाईट शब्दही बोलणार नाहीत. कधीच नाही. संताच्या खाजगी जीवनाबद्दल तुम्हाला काही माहित आहे हे मला माहीत नाही पण भारतातील संत एकमेकांची कशी काळजी घेत, एकमेकांशी कसे वागत तो प्रकार किती सुंदर, उदात्त आहे.

लोक दुसऱ्याच्या भावनांची कदर करीत केवळ आम्हांस कांही विशेष सांगायचे आहे किंवा मिळवावयाचे आहे किंवा आम्ही कोणीतरी विषेश आहोत म्हणून नव्हे. जेव्हा तुम्ही सहज योगांत उतरता तेव्हा तुमची सर्व वैशिष्ठे संपली. काही लोकांना वाटते आम्ही म्हणजे विषेश आहोत. समजा एखाद्या स्त्रीला मी माझ्या पायाना अल्ता (कुंकवाचे पाणी) लावण्यास बोलावले. तर तीला वाटायला लागते की मी कोणी विषेश आहे. पण तीची आज्ञा भयंकर असल्यामुळे मी तीला बोलावलेले असते. कोणीतरी मला तिच्या बद्दल सांगते की ती स्वतःला विषेश समजते, मी म्हणते खरेच तीला कशामुळे असे वाटते - उत्तर येते कारण तुम्ही तीला अल्ता लावायला बोलाविले म्हणून मी सांगते मी तीला बोलाविले कारण तीची आज्ञा फार खराब आहे व तीने कोणाला त्रास देऊ नये. तीची आज्ञा स्वच्छ करावी म्हणून मी बोलावलं. जर तीच्या लक्षात येण्यासाठी मी स्पष्ट सांगीतलं असतं की तुम्ही अहंकारी अहात भयंकर अहात

तर तीला ते कळले नसते, याचेच मला आश्चर्य वाटते.

एक बाई अशी होती की तीला सासरच्या लोकांबद्दल व भारतातल्या सर्व लोकांबद्दल तिरस्कार होता. आणि ती मला भेटायला आली. मी तीला ठणकावून विचारले' तुला असे विचित्र वागण्याचे कारण काय ? तुझे वडील एवढे जन्माद्य होते त्या बद्दल कधी ब्रसुद्धा काढला नाहीस आणि या लोकांबद्दल नुसते काहूर उठवितेस. तीने बाहेर गेल्यावर इतरांना सांगितले बघा श्री माताजीनी मलाच बोलावले दुसऱ्या कोणाला भेटायची परवानगी ही नाही. म्हणजे हा काय भयंकर प्रकार आहे. गंमतच आहे या लोकांची. त्याना वाटते आम्ही विषेश आहोत व स्वतःलाही तसे समजतात हीच खरी अडचण आहे.

माझे प्रेम व्यक्त करण्यासाठी किंवा त्यांच्या कामाची शाबासकी देण्यासाठी मी एखाद्याला जवळ बोलावून एखादी भेटवस्तू देते, त्याला आपण कोणीतरी विषेश झालो आहोत असे वाटू लागते. सगळे अतर्क्यच आहे.

मी एखाद्याला शाबासकी दिली किंवा त्या व्यक्तिबद्दल आपुलकी दाखविली याचा अर्थ तो नम्र, प्रेमळ प्रामाणिक असा उत्तम सहजयोगी बनावा अशी माझी अपेक्षा असते.तर असे दाखविण्यात काहीच अर्थ उरला नाही. याचा अर्थ ती व्यक्ति रसातळाला पोहोचलीच म्हणून समजा.ही विषेशत्वाची भावना/कल्पना म्हणजेच तुम्ही तुमच्या विशेषत्वाची जाणिव संपविली. एखादा थेंब समुद्रात मिळतो म्हणजे समुद्रच होतो तो थेंब रहात नाही. एखादा स्वतःस विषेश समजतो म्हणजे तो समुद्र बनत नाही. तुम्ही अजून थेंबच अहात. ही सर्व विशेषत्वाची भावना तुमच्या भूतकाळातून उद्‌भवते.एक स्त्री मागे मला भेटली होती.ती अतीशय उर्मट, उद्धट व गर्वीष्ट होती. हे दिल्लीत घडले. जेथे हे लोक आपल्या नवऱ्याच्या पदाबद्दल इ. इ. बद्दल जास्त रूबाब दाखवितात. मला माझ्या पतीच्या पदाबद्दल बिलकूल माहित नाही. मी तीला विचारते, "काय ग एवढे तोऱ्यांत काय वागतेस? काय प्रश्न आहे. ती म्हणाली मी अमक्या तमक्याची पत्नी आहे. मी म्हणाले पत्नि की नवरा? तीने विचारले तुम्ही येथे काय करता? मी उत्तरले मी माझ्या घरकामात व्यग्र आहे. नंतर माझे मिस्टर तेथे आले. तिने मला विचारले तुम्ही यांना ओळखता कां? मी हो म्हणाले, का? मला वाट वाटते तेथेही काही गडबड आहे. नाही. म्हणजे तुमची त्यांची कशी काय ओळख जणू काही मी अपराधच केला आहे. अशा भावनेने तीने मला विचारले. मी म्हणाले ते माझे यजमान आहेत. अरेच्या तीला सापाने दंश केल्या प्रमाणे तीने दचकून म्हटले "हे तुमचे मिस्टर आहेत" कारण तीचे मिस्टर माझ्या यजमानांच्या पेक्षा खालच्या पदावर असावेत.

तर विशेषत्वाची भावना सहजयोग्यांनी सोडून द्यावी. नुसत्या विचारातून नव्हे. मनातून तुम्ही जरी सारखा मंत्र केला "मी विशेष नाही" "मी कोणी नाही" मग गुंता अधिकच वाढेल. तुम्ही म्हणाल "माझ्या सारखा कोणी आहे कां? २३००० वेळा मी मंत्र जपला "मी कोणीतरी विशेष, कोणीतरी मोठा आहे" मी या सर्व गटामधे कोणीतरी वरचढ आहे ही कल्पना गळून पडते, जेव्हा समुद्रात पडलेला थेंब सागरांत विलीन होतो. तुम्ही सागरच होता. तुमचे व्यक्तित्व संपते. याला काही परिमाण नाही की ज्या परिमाणाने हा मोठा हा लहान असा फरक करता येईल. यातूनच जगांत समस्या निर्माण होतात. आपल्या भारतातील जातीवाद पहा पाश्चिमात्य देशतील सामाजिक रचना, वर्णभेद हे सुद्धा स्वत्वाच्या जाणीवेतून निर्माण झालेत जसे माझाच धर्म श्रेष्ठ तुमचा खालच्या दर्जाचा. आम्हीच श्रेष्ठ आहोत. यातूनच सर्व समस्या निर्माण झाल्या त्याने काहीच साधले नाही, उलट नुकसानच झाले केवळ नुकसान. तर सहजयोगांत तरी या रोगाची लागण होऊ नये. मी श्रेष्ठ आई आहे माझा देश श्रेष्ठ आहे या भावना तुम्ही घालवा आणि आपल्या व्यक्तिमत्वाचे सौंदर्य दिसू द्या. यासाठी तुम्हाला विशेषत्वाची जरुरी नाही. विशेष शरीराची जरुरी नाही. किंवा देशणेपणाचीही नसून सुंदर हृदयाची जरुरी आहे. सुंदर हृदय सर्वांना आकर्षित करते, दुसरे काही नाही. तुमचे हृदयही असेच हवे. अशी लोकं मला माहीत आहेत.

एका सजयोग्याने पहिल्या बायकोला घटस्फोट दिला कां तर ती कुरुप आहे, बेढब आहे. मग त्याने एक सुंदर युवती बरोबर लग्न केले. त्यानंतर तो घर सोडून पळून गेला. मी विचारले आधीची कुरुप होती म्हणून तीला सोडले आता काय झाले? तर तो म्हणाला दुसरीला हृदयच नाही. आणि अशा प्रकारे तुमचे हे ईश्वराने दिलेलं हृदय अत्यंत उदार, धार्मिकतेने भरलेले आहे. या देणगीचा तुम्ही आदर केला पाहिजे. त्याबद्दल अभिमान वाटायला हवा. त्याचा आनंद घेतला पाहीजे. तुमच्या उदारतेचा जसा आनंद घेता तसा, निसर्ग स्वतःच्याच आनंदात असतो तसा आनंद लुटा. जास्त चिकित्सा ठेवणे, लोकांच्या चुका काढणे व दुरुस्त करून घेणे म्हणजे एक डोकेदुखीच. उत्तम म्हणजे तुम्ही स्वतःला ठिक करा, स्वतःलाच हंसा हाच उत्तम मार्ग आहे. प्रत्येकाची काहीतरी गंमतीची बाब असते. माझ्याही बाबतीत आहे. कबूल करते. प्रयत्न करूनही मी विसरून जाते. उदा. हा चष्मा मी नेहमीच विसरतो. अगदी निघायच्या अगोदर घ्यायचा घ्यायचा म्हणून आठवण ठेवूनही ऐनवेळी विसरते. मी गणितात प्रवीण आहे. मी मोजू शकत नाही. चेक कसा भरायचा तेही मला माहित नाही. खरे वाटते तुम्हाला? दुसरे मला चेक भरून देतात.

अति चिकित्सक लोक नेहमी अयशस्वी ठरतात कारण त्यांचा मेंदूच त्यांच्यावर शक्कल लढवतो. एका गृहस्थाने एकदा सांगितले की तुमच्या मोटारीचा आकार येवढा येवढा आहे म्हणून गॅरेजचा आकारही असा असा हवा. मी म्हणाले ठिक आहे मग जेव्हां गॅरेज बांधले तेव्हा मोटारच आंत जाईना. एवढा मोठा चिकित्सक आर्किटेक्ट ज्याला बक्षीसे मिळाली होती तो अशी चूक कशी करू शकतो, हे मला कळेना. त्याने मला दुसरी छोटी मोटार घेण्यास सुचविले. मी म्हणाले आता तरी गॅरेजनीट मोजणी करा नाहीतर दुसरी गाडी विकत घेऊन तीच तऱ्हा.

आपण आपल्या बद्दल जास्त लक्ष देऊन जास्त चिकित्सक असतो ही छोटी छोटी फुले बघा ते स्वतः आपोआप वाढतात, प्रत्येकाला सूर्याचा प्रकाश मिळतो ती मजेत असतात. पण ही माणसे स्वतःबाबत दक्ष असूनही डोकेदुखी ओढवून घेतात व नंतर कळते की ते असे नाही.

आता तुमच्या मधील चिकित्सकपणा संपला. एक सहजयोगीनी तीचे दुकान होते ती म्हणाली "माताजी मला या दुकानातील प्रत्येक गोष्ट माहीत आहे, व प्रत्येक वस्तूची किंमतही ठाऊक आहे. पण जेव्हा मला आत्मसाक्षात्कार मिळाला त्यानंतर मी ते सर्व विसरले. मग मी विचारले, "तुला कसे वाटते? चांगले की वाईट? ती म्हणाली चांगले. मी त्याचे कारण विचारले ती उत्तरली "मला आता फायदा जास्त होतो. फायदाच महत्वाचा आहे. प्रत्येक गोष्ट लक्षात ठेवण्याची काय जरुरी आहे. झाडांना कुठलीच पद्धत नसते, पद्धत नसूनही पद्धतशीर वाढ असते काही पाने एकीकडे काही दुसरीकडे. काही फांद्या दुसरीकडे तर काही तीसरीकडे त्याला काही रीत नाही. नाहीतर तुम्ही लष्करा सारखे होता. सगळे पद्धतशीर सहजयोगांत काही आखीव नाही. आम्ही वेळेच्या पलीकडे आहोत. कुठल्याही ठराविक साच्याच्या पलीकडे आहोत. स्वतःला पटेल तीच रीत. या दोन हातासारखे. त्यांना कुठल्या तऱ्हेची बांधर्णाल की नाही पण ते काम करत असतात कुठल्याही वैचारिक तऱ्हेची बांधणी करणं हे सहजयोगा विरुद्ध आहे. काही लोकांनी मला लिहीले तुमच्या प्रतीचे मला भाषांतर करायचे आहे, हे करायचे आहे ते करायचे आहे. मी म्हणाले ते विसरून जा, तुम्ही जर योजना करत बसलात तर त्यात अडकून पडाल. मग ती योजना राबवताना, ही बरी कां ती बरी मग दुसरी का नको इ.

पश्चिमेत लोक जास्तच तऱ्हेवाईक आहेत. जसे लोकांच्यासाठी काटे चमच्यांचा वर्ग चालवतात. ते कसे वापरावयाचे, कसे खायचे, काय खायचे इत्यादी. हे फारच आहे. जर तुम्हाला खायचेच तर सरळ जा हातानी खा! त्यात कसले तंत्र. ही सर्व आचार वैशिष्ठे पश्चिमेकडे फार आहेत ती कमी केली पाहिजेत. याच्या विरूद्ध एक नवी संस्कृती उद्यास आली. हा एक दुसरा मूर्खपणा. दुसऱ्याच पद्धती त्यांनी

निर्माण केल्या ते आता हिप्पी म्हणून ओळखले जातात. केस वाढवलेले, न धुतलेले डोक्यात उवां तश्याच त्यांत वेगळेपण नाही. एक दुसऱ्या सारखा तसाच वेगळा करता येणार नाही. एखाद्याने (कानात) डुल घातला कीं प्रत्येक जण तसेच करील विनडोकपणे न समजता. ते स्वतःबद्दल व व्यक्तिमत्वाबद्दल बोलतात त्यात वैयक्तीकपणा कसला? तुमचे टोळके जे ठरवेल ते तुम्ही पाळता त्यामुळे फॅशनेबल होता. भारतात जास्त फॅशनेबल म्हणजे अधिक खर्चाचे अति सौंदर्यवर्धक उद्यभु फॅशनेबल म्हणजे सगळ्यांना आवडते. कोणतेही क्षुद्र ते असो ते फॅशनेबल म्हणजे खलास. फॅशन म्हटली कीं तुम्हाला स्वतःच्या कल्पना नाहीत, व्यक्तित्व नाही स्वत्व नाही. सहजयोगांत तुम्ही कुठल्याही फॅशनशी निगडीत नाही. तुम्हाला जो पोषाख आवडेल तो वापरा. तुम्हाला जे आवडेल ते कराव पण मी सांगते त्या प्रमाणें स्वतःवर तुम्ही ताबा ठेवा. तुम्ही तुमचे गुरु असा. तुमचेच मालक व्हा. तुम्ही जे कराल ते चांगलेच असेल चांगल्या प्रतीचे असेल, जे देवतांना आवडेल. याच पद्धतीने वागाल कारण तुम्ही सहजयोगी आहांत. मग सर्व जीवन सुखावह होते. जे जवळ नाही त्या बद्दल चिंता नसते. समजा एखादी गोष्ट तुम्ही पाहता तुमच्याकडे ती असेल ती दुसऱ्या करता घ्याल. तुम्ही तसेच कराल. समजा माझ्याकडे अंगठी असेल ती माझ्या बोटात जात नसेल तर ज्याच्या बोटात बसेल त्याला मी देईन. मग मी सगळ्यांच्या बोटाकडे बघीन ज्याला बसेल त्याला देईन. हा दुसऱ्या बाजूचा विचार असेल. समजा तुम्ही सहजयोगी नसता तर त्याचे सोने काढून घेण्याचा किंवा विकण्याचा विचार केला असता. किंवा खडा काढून घेतला असता. असा खोडसाळ विचार केला असता. मला घालायची नाही नां? मी दुसऱ्याला कश्याला देऊ. काय हरकत आहे. पण सहजयोगातच हे शक्य आहे. मी पाहीले आहे काही लोक दयाळू व प्रेमळ आहेत आणि दुसऱ्याला नेमके काय हवे आहे तेच भेट देतात. किंवा एक माझ्याकडे आहेच दुसरे मी देऊन टाकीन. ते सतत तसेच वागतात. दुसऱ्याचा विचार करतात. हे तुमच्यातील आनंद व करुणा दर्शविते. कॅनडातील एका सहजयोग्याचे घर फोडले गेले. त्याने मला लिहीले, माझे घर आता स्वच्छ झाले मी देवाचे आभार मानतो. काय करावे मला समजले नाही. नुसती अडगळ राहीली. तुमची विचार सरणी अशी होते. आता करायचेच तर एखाद्या सहजयोग्याला देऊन आपले प्रेम व्यक्त करावे. याच्या उलट लोकांनी घरातली अडगळ भेट दिली असती. पण ज्या वेळेला तुम्ही सजयोगी म्हणून करता तेव्हा ते सर्व चित्र बदलते. एखाद्या फुला प्रमाणें जे सतत आपला सुवास, अपल्या दयेचा प्रेमाचा कळवळा दुसऱ्यास देते.

हे नविन युग आहे पण मी म्हणते माझ्या समोर ही नविन मानव जात आहे आणि ह्या नविनतेचे अनेक पैलू आहेत, जे हिऱ्या प्रमाणें चमकतात. माझे तुम्हाला आशिर्वाद की तुम्ही त्यांत वाढावे व अधिक मोठे व्हावे.

पण मी दुसऱ्या पेक्षा मोठा आहे उच्च आहे यातून तुम्हाला शितलता मिळेल. कोणीतरी कधीतरी तुम्हाला इजा पोचविली असेल, काही हरकत नाही, कोणी रागावले असेल हरकत नाही, तुमची क्षमाशिलता किती आहे, दुसऱ्यांना प्रेम या प्रेमळ आणि दयाळू व्हा. जी २५ वर्षे संपलीत त्यात अनेक किचकट समस्या व चांगल्या घटना यांचे मिश्रण होते पण मी कधीही त्रासले नाही. काही कारणाने काही वेळेला मी रागावते किंवा काही गोष्टी ज्या साधारणपणे सांगू नयेत त्या सांगते कारण ती काळाची गरज असते. पण एकंदरीत सांगायचे झाले तर आपण सर्व एका मोठ्या जहाजात आहोत आणि सर्वजण इश्वरी प्रेमाच्या कक्षेत उतरलो आहोत आणि याचाच तुम्ही आनंद घ्या. जर एखाद्याकडे इश्वरी प्रेम व करूणा असेल तर ती त्याने दुसऱ्यास द्यावी. अशी मायेची एकतानता सौंदर्य भूत आहे किंतीचे शब्दात वर्णन करता येणार नाही. जसे काल मला बोलताच येईना. ज्या तऱ्हेने तुम्ही लोक सहजयोग स्विकारता, समजून घेता त्याबद्दल मी माझ्या भावना कशा व्यक्त करू असे मला झाले. त्याचे वर्णन करण्यास पृथ्वीतलावरचे शब्द अपुरे पडतील.

तुम्हाला सर्वांना अनंत आशिर्वाद !

# शिवरात्री पूजा

## ऑस्ट्रेलिया २६।२।९५

## (श्री माताजी निर्मलादेवी यांच्या भाषणाच्या सारांश)

आज आपण श्री सदाशिवांची पूजा करण्यासाठी येथे जमलो आहोत. जे आपल्यात शिवरुपाने स्थापित आहेत. ते शुद्ध आत्मा आहेत. आपल्या मधे असलेला शुद्ध आत्मा हे सर्वश्रेष्ठ परमेश्वर सदाशिवांचे प्रतिबिंब आहे. हे प्रतिबिंब सूर्याच्या पाण्यावर पडणाऱ्या प्रतिबिंबा इतके स्वच्छ आपल्याला दिसते. जर हेच दगडांवर पडले असते तर ते एवढे स्वच्छ दिसले नसते. तुमच्या जवळ जर आरसा असेल तर सूर्याचे प्रतिबिंब न पडता त्याचा प्रकाश परावर्तित होईल. ह्याचप्रमाणे मानवातील परमेश्वराचे प्रतिबिंब त्याच्या व्यक्तिमत्तातून परावर्तित होते. जर तुमचे व्यक्तिमत्व स्वच्छ, शुद्ध व अबोधित असेल, तर तुमच्यातील परमेश्राचे प्रतिबिंब आरशाइतकेच स्वच्छ दिसेल. म्हणूनच संतांच्या वागणुकीतून परमेश्वराचे प्रतिबिंब योग्य प्रकारे दिसते आणि म्हणूनच संतांचा चुकीच्या गोष्टींशी संबंध लावला जात नाही. अशा प्रकारे मानव जेव्हा शुद्ध आत्मा होतो तेव्हा त्याच्या दैवी शक्तिचे प्रतिबिंब दुसऱ्याच्या मनाचा वेध घेते.

सुदैवाने तुम्हा सर्वांना आत्मसाक्षात्कार मिळाला आहे. म्हणजेच तुमच्या चित्तात परमेश्वराचे प्रतिबिंब आधीच कार्यरत आहे. आत्म्याच्या शक्तिने तुमचे चित्त प्रकाशित केले आहे. आत्म्याची शक्ति म्हणजेच त्याचे प्रतिबिंब. ह्या प्रतिबिंबाची आरशातील अगर पाण्यातील सूर्याच्या प्रतिबिंबाशी कधीच तुलना करत नाहीत, कारण जोपर्यंत सूर्य तळपतो तोपर्यंतच हे प्रतिबिंब असते. तुम्ही सहजयोगात असल्यामुळे कुंडलिनी शक्तिने तुम्हाला अंतर्बाह्य स्वच्छ केले आहे आणि म्हणूनच हे परमेश्वरी प्रतिबिंब तुमच्या व्यक्तिमत्त्वातून, वागणुकीतून व इतर व्यवहारातून सगळीकडे अगदी स्पष्ट असे सर्वांना दिसत आहे.

आपण परमेश्वरी शक्तिचे प्रतिबिंब आहोत ह्यावर लोकांचा स्वतःचा विश्वास बसत नाही. त्यांच्या मनांत अजून शंका आहेत की, ते एकाएकी परमेश्वरी शक्तिचे प्रतिबिंब कसे बनले. तरीही त्यांच्यात परमेश्वरी शक्तिचे प्रतिबिंब बनण्याची पात्रता आहे. पण आपल्या उन्नतीवर, तसेच स्वतःच्या पात्रतेवर विश्वास हवा, म्हणजेच ते परमेश्वरी शक्तिचे प्रतिबिंब बनू शकतील. सहजयोगावर दृढविश्वास फार महत्त्वाचा आहे. माझ्या भाषणातुन आपण ऐकले / वाचले असेल की, प्रत्येकाला स्वतःला आत्मविश्वास हवा, आणि त्याचा अभाव असेल तर आपली उन्नती होणार नाही, परंतु आत्मविश्वास म्हणजे तुमचा अहंकार अथवा आक्रमकता नव्हे, तुम्ही जर निःशंक असाल तर तुम्ही आक्रमक असणार नाहीत.

चिनमधील एक मजेदार गोष्ट आहे ती अशी - चीनमध्ये एक राजा होता. त्याला त्याच्या कोंबड्यांनी कोंबड्यांची झुंज जिंकावी असे वाटत होते. त्याला कोणीतरी सांगितले की, चीनमध्ये असा एक संत आहे की, तो कोंबड्याला झुंज करण्याचे शिकवतो व त्याने शिकवलेला कोंबडा झुंज हारत नाही. म्हणून राजाने आपले दोन कोंबडे त्या संताकडे नेऊन दिले. महिन्यानंतर त्याने ते कोंबडे संताकडून आणले व झुंजीसाठी मैदानात सोडले. तेथे इतरही खूप कोंबडे होते. इतर कोंबडे ह्या कोंबड्याशी झुंज करू लागले तरी राजाचे कोंबडे सहनशीलतेने, शांत व स्वस्थपणे उभे होते. ते इतर कोंबड्यांचा हल्ला एक गंमत म्हणून पहात होते. शेवटी सर्व कोंबडे हल्ला करून कंटाळले व दमून झुंज सोडून पळून गेले. अशा तऱ्हेने ह्या दोन कोंबड्यांनी झुंज जिंकली. ह्याचे तात्पर्य आपण काय शिकायचे की, जर एखादा अलिप्त झाला, त्याच्यावर हल्ला, आक्रमण होणार नाही. आपल्या चऱ्याचशा व्यक्तिमत्त्वामुळे आपल्यावर हल्ले होत असतात. पहिल्यांदा आपले कुटुंब, मग आपला देश, नंतर धर्म आणि नंतर सर्व प्रकारच्या गोष्टी, जातीवाद वगैरे. अशा प्रकारे आपल्यावरील सारख्या होणाऱ्या आक्रमणामुळे आपल्याला कमकुवतपणा येतो आणि सहजयोग्यांच्या मनात एक प्रकारचा

गोंधळ निर्माण होतो. ह्याच कारण म्हणजे तुमचा सहजयोगावर दृढ विश्वास हवा, तसेच आत्मविश्वासही हवा, की आपण योग्य मार्गानेच जात आहोत. आपणास संरक्षण आहे व आपल्यावर कोणी आक्रमण करणार नाही, कारण तुम्हाला संपूर्ण दैवी संरक्षण आहे.

लोक कोणताही धर्म पाळोत, कोणत्याही गुरूचे शिष्यत्व पत्करोत अथवा काहाही आचरोत त्यांना त्यावर आक्रमण होण्याची सतत भीती असते आणि म्हणून ते त्यांनी जे सांगावला हवे ते सांगू शकत नाहीत. एवढेच नव्हे तर काय सांगावे याचे त्यांना तारतम्यच रहात नाही. तुम्ही शुद्ध आत्मा आहात याची योग्य समज असेल व आत्मविश्वास असेल तर तुम्हाला आश्चर्य वाटेल व कळेल की आपण करत आहोत ते ठीक आहे. अशा प्रकारे आपण म्हणू शकतो की, आम्ही सामूहीक असण्याचा आम्हाला आणखी एक फायदा आहे आपण सामूहिकतेत कसे वागतो ह्याचा आपण शोध घेऊ शकतो. सामूहिक प्रतिक्रिया काय आहे? तर सामूहिकतेतला मनुष्य अत्यंत हुषार, त्याला जास्त बोलण्याची गरज नसेल, त्याला जास्त सांगण्याचीही गरज नसेल. तो वरील कोंबड्याच्या गोष्टीतील कोंबड्याप्रमाणे शांत राहील. परंतु त्याची गहनता जाणवेल. तो आक्रमक नसला तरी त्याच्या गहनतेची खोली तुम्हाला जाणवेल. तो आतून स्वतःला संरक्षित जाणतो. हे संरक्षण मानसिक नसून आत जाणवणारे असले पाहिजे आणि जर का एकदा तुम्हाला गहनता / जाणीव आली की मग तुमच्यावर कोणी आक्रमण करत नाही. आक्रमक कोणी असो. असंस्कृत असो अगर सहजयोगी. तो स्वतःच असुरक्षित असतो म्हणून तुमचा प्रत्येक माणसाबद्दल दयापूर्ण दृष्टिकोन असावा.

शिवाप्रमाणेच कोणालाही क्षमा करणारा असे आपण सदाशिवाला म्हणू शकू. जे एका पायावर उभे राहून, डोक्यावर उभे राहून उपासतपास करून, खडतर तपश्चर्या करून सदाशिवाला प्रसन्न करण्यासाठी प्रयत्न करीत, त्यांना व त्यांचे हे विचित्र प्रकारचे तप पाहून उद्विग्न होऊन ज्याला जे पाहिजे ते 'वर' श्रीसदाशिवांनी दिले. आणि अनेक राक्षसांनाही त्यांच्या घोर तपाला कंटाळून वर दिले.

सदाशिवांनी लोकांना 'वर' दिल्याच्या अनेक कथा आहेत. त्यात रावणालाही वर मिळाल्याचे आहे. रावणाबद्दल एक मनोरंजक कथा आहे. सदाशिवाला कंटाळा येईल अशा प्रकारचे, दहा तोंडे असतानाही उपास करून रावणाने कोणते तप केले हे मला ठाऊक नाही. त्यांची करूणा इतकी अगाध आहे की, त्याला वाटले की, रावणाला काय हवे असेल ते द्यावे. रावण सदाशिवांकडे गेले आणि सदाशिवांनी विचारले, तुला काय हवे? तू एवढा स्वतःस त्रास का करून घेत आहेस? तो म्हणाला, मला 'वर' पाहिजे. शिव म्हणाले, कोणता? रावण म्हणाला, -'मी मागेन ते देईन असे वचन द्या'. शिव म्हणाले, "माझ्या आवाक्यात असेल तर मी देईन." रावण म्हणाला, "मला तुमची पत्नि हवी आहे". कारण त्याला माहित होते की, श्री सदाशिवांची पत्नि आदिशक्ति आहे आणि ती मिळाल्यावर तो चमत्कार करू शकेल म्हणून त्याने शिवाजवळ त्यांची पत्नि त्याची सहचारिणी म्हणून मागितली. या राक्षसाला आपली पत्नि देण्याचा निर्णय घेणे अत्यंत अवघड, पण त्यांच्या करूणेत त्यांनी ते केले. ह्या सर्व प्रसंगावरून त्यांच्या करूणेत कसे कार्य होते ते दिसते.

शिवांनी आपली पत्नि रावणाला देण्याचे मान्य केले व तिने त्या भयंकर अशा माणसाबरोबर जाण्याचे ठरले. शिवांनी रावणास सावध केले आणि सांगितले की, "पार्वती ही भूमिकन्या आहे, तिला जर खाली ठवेशील तर भूमिमाता तिला आपल्यात सामावून घेईल, तरी सर्व वेळ तिला आपल्या पाठीवरून ने. श्रीकृष्ण हा पार्वतीचा भाऊ. त्याला या भयंकर राक्षसाबरोबर आपली बहीणजाणार हे रूचले नाही. शिवाय तो खट्याळ. त्याने युक्ति केली. रावणाला बाथरूमला जाण्याची इच्छा निर्माण केली. रावणाला पाठीवर पार्वतीला घेऊन जाण्याची लाज वाटली, त्याने तिला खाली ठेवले. लगेचच भूमातेने तिला आपल्यात सामावून घेतले. रावणाला काय करावे सुचेना. दुसऱ्यावेळेस रावण शिवांकडे परत गेला, व म्हणाला, ' तुम्ही वचन देऊन निराळेच काही करीत आहात.' शिव म्हणाले, "तिचा भाऊ श्रीकृष्ण हा फार खोडकर आहे आणि तो काहीही करून ते होऊ देणार नाही, तरी सावध राहून ह्यावेळी त्याचे काही न ऐकता तिला जमिनीवर ठेऊ नकोस.

दुसऱ्या वेळी रावण पार्वतीला पाठीवरून घेऊन जात असताना रस्त्यात त्याला एक लहान मुलगा त्याचेकडे पाहून हसताना दिसला. (ते श्रीकृष्ण होते) रावणाने त्याला विचारले, 'तू माझ्याकडे बघून का हसतोस?' तर तो मुलगा म्हणाला, "ह्या म्हाताऱ्या बाईला तू का घेऊन जात आहेत? तेव्हा रावण म्हणतो, ती देवता आहे. तो मुलगा म्हणाला, "देवता आहे तर तिने दागिने वगैरे अलंकार का घातले नाहीत? तेव्हा रावणाने पाहिले तर, त्याला आपल्या पाठीवर तोंडात दात नसलेली व त्याचेकडे पाहून हसत असलेली म्हातारी दिसली, आणि त्याने भिऊन तिला टाकून दिले. ती महामाया होती.

तिसऱ्या वेळी तो शिवाकडे गेला व म्हणाला, की तुम्ही तुमच्या पत्निला सांगा की, ' तू कोणाचे ऐकू नकोस'. आणि तिला माझ्या ताब्यात द्या. नंतर शिव त्याला म्हणाले, "ठिक आहे, ती मंदोदरी नावाने श्रीलंकेत जन्म घेईल. मग तू तिच्याशी

विवाह कर." अशी ही कथा पुढे चालू राहिली. मंदोदरी ही श्रीविष्णुची परमभक्त होती. रामाचे रावणास मारण्यासाठी श्रीलंकेतील आगमन हे मंदोदरीनेच योजले होते. कारण तिला माहित होते की, रामाने रावणाचा वध केला तर रावणाला स्त्रियांच्या बाबतीतील त्याच्या कल्पनांपासून मुक्ति मिळेल. त्याच्या वधामागे तिचा असा हेतू होता की, रावणाने पुनर्जन्म घेऊन सुंदर स्त्रियांच्या बाबतीतील मोहापासून परावृत्त व्हावे. सीतेला ज्या पद्धतीने त्याने पळवून आणले त्याबाबतीत ती प्रथमपासुन विरोधात होती. पण त्याने तिचे ऐकलेनाही. म्हणून राम-रावण युद्ध झाले आणि रामाने रावणास मारले.

ही सर्व कथा श्रीशिवांच्या अमर्यादित करूणेतूनच घडून आली. त्यांची करूणा कधी कधी अतर्क्य वाटते. पण त्याच्यामागे फार मोठी योजना असते. ते जे काही करतात, त्याचे (प्रश्नाचे) उत्तरही तयार ठेवतात. उदाहरणार्थ, एकदा युद्ध चालू होते, त्यावेळी अशी समस्या निर्माण झाली की, ज्या भयंकर राक्षसाला शिवांचे वरदान प्राप्त झाले होते की, तुला कोणाकडूनही मृत्यू येणार नाही. तसेच आणखी एका संताला, तुला झोपेतुन कोणीही जागे करणार नाही; आणि जर कोणी जागे केले तर त्याच्याकडे दृष्टिक्षेप टाकताच त्याचे भस्म होईल असे वरदान दिले होते. हे श्रीकृष्णास ठाऊक होते. त्याने विचार केला की, संताला दिलेल्या वरदानाने राक्षसाला दिलेल्या वरदानावर मात करता येईल. आणि त्याने केली. युद्ध सुरू झाल्यावर श्रीकृष्णाने रणांगणातून पळ काढला आणि तो संत ज्या गुहेत झोपला होता तेथे गेला. पळत असताना श्रीकृष्णाच्या अंगावर शाल होती. ती शाल त्याने गुहेत हळूच शिरून त्या संतावर पांघरली. राक्षस मागोमाग आल्यावर त्याला श्री कृष्णाने पांघरलेली शाल दिसली. आणि तो म्हणाला, तू दमून येथे येऊन झोपलेला दिसतोयस. तेथे कोण झोपले आहे याचा विचार न करता तो म्हणाला, मी तुला सरळ करतो. आणि त्याने ती शाल ओढली. तेव्हा तो वरदान मिळालेला संत जागा झाला व राक्षसाकडे तिसरा डोळा उघडून त्याने पाहिले व पाहताच लगेच तो राक्षस भस्मसात झाला. अशा तऱ्हेने संकट निरसन झाले.

अंतिम विजय सत्याचा होतो हे दाखविण्यासाठी तीन शक्तिंच्या प्रभावाखाली असे हे नाट्य घडत असते. प्रथम एका बाजूने श्री शिवांची करूणा, त्यांची सहृदयता कार्य करते. नंतर श्री कृष्ण किंवा श्री विष्णू म्हणू या तटस्थता दर्शवतात आणि तिसरे म्हणजे श्री ब्रह्मदेव यांची निर्मिती किंवा नवनिर्मितीची भूमिका. ह्या तीनही शक्ति आपल्या मानवी जाणीवात काहीतरी वेगळे करण्याची उर्मि जागृत करण्यासाठी वातावरण निर्माण करण्यासाठी कार्य करीत असतात. त्या आपल्या मनात सत्याचा शोध घेण्याची इच्छा निर्माण करतात.

एका बाजूने श्री शिव हे अतीव करूणामय व फार दयाळूपणे असुर किंवा राक्षसांशी सुद्धा वागतात. पण दुसऱ्या बाजूने श्री शिव हे अत्यंत कठोर आहेत. जर लोक अवनतिकडे जाऊ लागले, परमार्थाकडे दुर्लक्ष करू लागले, जर त्यांची अबोधिता पूर्णपणे नष्ट झाली असेल, ते जर चुकीच्या गोष्टींपासून विरक्त झाले नसतील आणि ह्या जगात ते जर समस्या निर्माण करत असतली तर ते सर्व जग नष्ट करतील ते आदी शक्तिच्या कार्याचे प्रेक्षक / साक्षी आहेत. ते आदिशक्तिला मानवाच्या निर्मितीला व त्याला साक्षात्कार देण्यास परवानगी देतात. पण जर त्यांचे लक्षात आले की, तीची मुले किंवा लोक ज्यांचे तिने रक्षण केले आहे, ते विचित्र वागत असतील, अवमान करत असतील अथवा तीच्या कामाचा विध्वंस करत असतील तर ते इतके रागावतात की, त्यांच्या रागावण्याने ते जगाचाही नाश करू शकतात. सहजयोगी सर्व दूर पसरल्यामुळे त्यांना तसे करण्याची वेळ येणार नाही असे मला वाटते. सहजयोग्यांमध्ये काही सहजयोगी हे फारच लवकर प्रगती करतात. स्थिरपणे पण जोमाने ते शिवतत्त्व स्वतःमध्ये प्रस्थापित करतात. प्रथम ते आतुन प्रत्येक गोष्टींबद्दल अलिप्तता साध्य करतात. ही विरक्ति मानसिक नव्हे. याचाच अर्थ संन्यास घेऊन हिमालयात जाणे नव्हे. किंवा संसाराचा त्याग करणे नव्हे तर ती विरक्ति स्वतःच्या आतुनच आली पाहिजे.

ती विरक्ती जेव्हा तुमच्यांत कार्यरत होते तेव्हा तिचे पहिले लक्षण म्हणजे तुम्ही आनंदी होता. आपण सुखी होतो. जर तुम्ही कोणाला विचारले की, तुम्ही कां दुःखी आहांत तर तो तुम्हाला त्याच्या पत्नीविषयी, घराविषयी, मुलांविषयी, देशाविषयी, व समाजाविषयी सांगत बसेल. तो त्याच्या सभोवताली घडणाऱ्या घटनांमुळे निराश व दुःखी होतो. आता तो आत्मसाक्षात्कारी झाला आहे. आणि आता त्याला दुःख करण्याचा काही उपयोग नाही. आता देशाचे, कुटुंबाचे, समाजाचे दोष सुधारण्यासाठी इतरांमध्ये परिवर्तन घडविण्याची गरज आहे. आणि ते करत असताना दुःख न करत बसता पूर्णपणे विरक्ति बाणणे महत्त्वाचे आहे.

प्रथम जेव्हा मी सहज योग सुरू केला, तेव्हा लोकं स्वतःच्या देशबांधवाविषयी धर्माविषयी, ते करत असेलेल्या चुकीच्या गोष्टी विषयी सांगताना बघून मला आश्चर्य वाटले. त्यांनी जेवढे सांगितले तेवढे मला माहित नव्हते. मला वाटले की, त्यांच्यामध्ये आलेल्या अलिप्ततेमुळेच ते आपल्या समाजामधील, लोकांमधील, धर्मामधील, कुटुंबामधील, देशामधील व सर्व जगा मधील दोष स्वच्छपणे / स्पष्टपणे पाहू शकतात.

जेव्हा तुम्ही त्यांच्यातील एक नाही असे समजाल तेव्हाच हे शक्य आहे. अन्यथा तुम्ही ते दोष पाहू शकणार नाही. तुम्ही त्या माणासामध्ये काय दोष आहे हे पाहू शकणार नाही. कोणत्या चक्रांना पकड येत आहे ते देखील तुम्ही कधीच ओळखू शकणार नाही. म्हणून पहिली गोष्ट म्हणजे अलिप्तता बाणली पाहिजे. पण अलिप्तता कशी प्राप्त करायची हा प्रश्न आहे. खूप लोक मला विचारतात कि श्री माताजी आपण अलिप्तता कशी मिळविता. मी कशाला लिप्त नसल्यामुळे मी आधीच अलिप्त आहे. म्हणून अलिप्त कसे व्हायचे हे मला माहितच नाही. पण तुम्ही स्वतःला ओळखण्यासाठी आत्मपरिक्षण करा. आपण कश्यामध्ये गुंतलो आहोत ते शोधण्याचा प्रयत्न करा. मी का दुःखी आहे? मी कोणाची चिंता करतो? मी का चिंता करतो? वगैरे.

काही गोष्टी फारशा महत्त्वाच्या नसताना त्या काही सहजयोग्यांना अत्यंत महत्त्वाच्या वाटतात. उदाहरणार्थ, पाश्चात्य लोक त्यांच्या मुलांची फारशी काळजी घेत नाहीत असे मी ऐकले होते, परंतु आत्मसाक्षात्कार घेतल्या घेतल्या ते आपल्या मुलांना डिंक लावल्यासारखे चिकटून बसतात. त्यांच्या मुलांसाठी काय चांगले आहे त्याचा ते विचार करू शकत नाहीत. मुलांची प्रत्येक गोष्ट हे त्यांचे आद्य कर्तव्य आहे असे त्यांना वाटते. त्यांचे संपूर्ण चित्त मुलांकडे जाते. पण मुलांना तेथेच सोडून देणे हेच योग्य आहे. अलिप्तता ही आतूनच विकसित झाली पाहिजे. अलिप्ता ही लादता येणार नाही. पण ध्यान धारणेने ती तुमच्यात विकसित होईल व त्यामुळे ती आनंददायी ठरेल.

जर तुम्ही शुद्ध आत्मा झालात तर तुम्ही अलिप्त असता कारण तुम्ही परमेश्वरांचे प्रतिबिंब असता. ही सर्व तादात्म्यता सुटते. एकादा म्हणेल कशी सोडायची? पहिले म्हणजे ध्यान करून. तुम्ही स्वतःचे दोष शोधून काढा. कोणती बाजू पकडत आहे 'डावी' का 'उजवी' ते पहा. हे ध्यानाने साध्य होईल. तुम्ही सहज संस्कृती विरूद्ध पैश्यांत, व्यवसायात कौटुंबिक गोष्टीत अथवा देशात गुंतला आहात काय? ध्यानाने तुम्ही त्याच्या पासून मुक्त होऊ शकता. तुम्हाला डाव्या व उजव्या बाजूच्या पकडीतून कसे मुक्त व्हावयाचे हे माहित आहे. ही पकड तुमच्या बोटांवर तुम्हाला जाणवेल आणि तुम्हाला कोणती चक्र पकडत आहेत हे कळेल, व तुम्ही कोणत्या त्रासात अडकलेले आहे हे समजेल. मग तुम्ही सहजयोगाच्या साध्या उपायांनी ती स्वच्छ करू शकाल. एखाद्या गोष्टींत आपण गुंतलो की आपण त्यांत गुतलो आहे हे लक्षात येत नाही इथेच आपण चुकतो. आपण ह्याच्यावर प्रेम कर त्याच्यावर प्रेम कर असे करतो तेव्हा आपल्याला वाटते की आपण काही मोठी गोष्ट करत आहे, कारण आपल्यात श्री शिवाची करूणा प्रस्थापित झाली आहे. पण हे तसे नाही कारण श्री शिवांची करूणा ही अत्यंत शुद्ध आहे, कारण ती एकाच गोष्टीला चिकटून असत नाही. ज्याप्रमाणे आडातील जीवनरस झाडाच्या निरनिराळ्या भागांना सारखा पुरवठा करतो व तो एक तर उडून जाते अथवा खाली जाऊन जमिनीत परत जातो, तो एकाच भागाला चिकटून रहात नाही जर एकाच फुलाला अगर पानाला अगर फळाला रस पुरवत राहील तर त्या झाडाचेही नुकसान होईल व फूलही नष्ट होईल. म्हणून एकाच गोष्टीला किंवा कल्पनेला चिकटून बसणे योग्य नव्हे.

सहज योगामधे लोक परिस्थितीशी जुळवून घेणारे असतात व त्यांना काय करावे यांची त्यांना जाण असते. परंतु प्रामुख्याने ध्यान हे महत्त्वाचे आहे. जेव्हा तुम्ही हृदयावर म्हणजेच शिव तत्वावर ध्यान करता तेव्हा नक्कीच अलिप्त होता आणि परम आनंदाला प्राप्त होता. लोकांना जेवणात, कपड्यांत किंवा घरात किंवा आणखी कशात जास्त रूची असते. रूची असावी परंतु त्यात अडकून पडू नये.

पश्चिमेत लोक नको त्या गोष्टींच्या मागे धावत असतात. त्यांचे व्यक्तिमत्व विकसित नसल्यामुळे ते फॅशनच्या आहारी जातात. जर तुमचे व्यक्तिमत्त्व पूर्ण विकसित असेल तर तुम्हाला इतरांपेक्षा निराळ्या व उच्चदृष्टिकोनांतून सर्व गोष्टींकडे पाहता येईल. व इतरांसारखे तुम्ही वाहून जात नाही. तुम्हाला जे काही माहीत आहे ते उच्च दर्जाचे, श्रेष्ठ व जास्त आनंद देणारे आहे. हा जिव्हाळा लोकांच्या मते आनंददायक असतो. तुम्हाला वाटते की लग्न झाले, बायको मिळाली, मुले झाली की हे सर्व आपल्याला आनंद देतात. परंतु ही अगदी चुकीची कल्पना आहे. आनंद हा तुमच्या मधील आत्म्यातून मिळतो. तुमचा नवरा अथवा मुलं चांगली असोत अगर नसोत ते तुम्हाला आनंद देत नाहीत. तुच्या आतूनच तुम्हाला आनंद मिळतो आणि तुम्ही क्षमाशील बनता. जर तुम्हाला कोणी त्रास देऊ शकत नसेल तर तुम्ही कोणावर रागावणार? पराकोटीची क्षमाशिलता हा श्री शिवांचा दुसरा श्रेष्ठ गुण होय. परंतु श्री शिव हे आदिशक्तिने निर्मिलेल्या विश्वाचा विनाश करण्यापर्यंतसुध्दा जाऊ शकतात. अन्यथा ते अत्यंत क्षमाशील आणि संतुलित असतात.

एकदा अधःपतन झालेल्या विश्वावर श्री आदिशक्ति संतप्त झाल्या आणि प्रत्येक गोष्टीचा विनाश करू लागल्या. तेव्हा श्री शिवांनी त्यांच्या पायाखाली एक लहान मुलं ठेवले त्या धक्क्याने खूप मोठी जीभ बाहेर काढून आदिशक्तिने विध्वंस थांबविला. श्री सदाशिवाचे मार्गच असे आहेत की, ज्या मनुष्याला स्वतःमध्ये शिवतत्त्व प्रस्थापित करायचे आहेत त्याला पराकोटीचे

क्षमाशिल असावे लागते. काही माणसं फार क्रूर व त्रासदायक असतात. जर तुम्हाला सहन होत नसेल तर संपून टाका. मी त्यावेळी तुमच्या बाजूने उभी राहीन. जर तुम्ही ते सहन करू शकत असाल तर ते सहन केलेले बरे. कारण त्यापासून दूर पळण्यापेक्षा सहन करणे चांगले. उदाहरणार्थ - एक स्त्री एकदा माझ्याकडे आली आणि म्हणाली मी माझ्या नवऱ्याला घटस्फोट देणार आहे. कारण तो खूप उशिरा घरी येतो आणि त्याचा सहवास मला कमी मिळतो. मी म्हणाले की घटस्फोट घेतल्यावर तो तुला अजिबातच मिळणार नाही. तर ह्यात काय तथ्य आहे. आता निदान वेळ असेल तेव्हा, तू त्याला बघू तरी शकतेस. पण घटस्फोट हा काही मार्ग नव्हे. तू त्याला घटस्फोट दिलास तर तू त्याला परत पाहू शकणार नाहीस. म्हणून अशा घटस्फोआला काय अर्थ आहे? जेव्हा तुम्ही सर्व गोष्टीपासून अलिप्त असता तेव्हा अशा सारख्या अनेक गोष्टी तुम्ही सहज समजू शकता. जर तुम्हाला कोणाबद्दल ॲटॅचमेंट नसेल तर तुमची कुरापत कोण काढणार? कोणही नाही. जर तुम्हाला विरोध करायचा असेल तर तो तुम्ही अलिप्तेतून करायला हवा. तुमच्या निषेधातही अलिप्तता अत्यंत गरजेचे आहे.

आज आपल्यापुढे असलेला प्रश्न काही वेगळा आहे. तो म्हणजे आपल्या सर्वांना उन्नत व्हायचे आहे आणि तेही समान शक्तिनिशी. जाळ्यात अडकलेल्या पक्ष्यांविषयी एक गोष्ट आहे. त्यांनी त्या जाळ्यातून बाहेर पडायचे ठरवले व प्रयत्न केला. प्रत्येकाने व्यक्तिशः जाळ्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न केला पण व्यक्तिशः कोणी यशस्वी झाला नाही. म्हणून त्यांनी सर्वांनी एकदम उडायचे ठरवले. आणि एक, दोन, तीन असे म्हणून जाळ्यासकट एकदम उडाले. नंतर त्यांनी उंदराला बोलावून जाळे तोडण्यास सांगितले व ते मुक्त झाले. जर हे पक्षी व उंदीर यांच्याबाबतीत होऊ शकते, तर आपल्या बाबतीत का होणार नाही? तुम्हाला आश्चर्य वाटेल की, आपण सामुहिकतेत एकमेकांना सहकार्य करून आनंदात राहू शकतो. समजा, तुमची आई, वडील, बहिण किंवा आणि कोणीतरी यांना काही समस्या असतील. हरकत नाही. आपल्याकडे सामुहिकतेत आनंदाचा सागर आहे आणि जर तुम्हांला तुमचे प्रश्न सोडवायचे असतील तर ते सामुहिकतेत सुटू शकतील. आपण सामुहिकतेवर अवलंबून राहिले पाहिजे. सामुहिकतेत एकरूप झाले पाहिजे. मला वाटते, एकदा तुम्ही सहजयोगाच्या सागरात उडी घेतली तर आनंद तुम्हाला एकत्रित बांधतो. एकमेकांना भेटण्यात आनंद आहे. अचानक बाहेर कोठे तरी सहजयोगी भेटला तर किती आनंद होतो त्याचे वर्णन बऱ्याच लोकांनी माझ्याजवळ केले व असे अनेक अनुभव आहेत. सहज योग्यांचे एकमेकातील अतुट नाते हा आनंदाचा मार्ग होय आणि तोच सामुहिकतेचा उगम होय असे म्हणता येईल. एकदा तुम्ही अेकमेकांत आनंद घेऊ लागलात ......

एकदा तुम्हाला मी भारतातल्या महान कवी नामदेवाची गोष्ट सांगितली होती, जो शिंपी होता आणि दुसरा एक कुंभार होता, आणि त्याचे नांव गोराकुंभार होते व तो ही कवी होता. जेव्हा नामदेव त्यांना भेटायला गेले. संत हे संताना संताप्रमाणेच भेटतात. नामदेवानी गोरा कुंभाराकडे पाहिले आणि थबकून उभे राहिले आणि त्यांनी सुंदर उद्गार काढले. मी चैतन्य पहावयास आलो पण माझ्यासमोर चैतन्य मूर्तिमंत उभे राहिली आहे. 'निर्गुणाचे भेटी आलो सगुणासी.' एकसंतच दुसऱ्या संताला असे म्हणू शकतो. दोन अथवा अनेक संतच एकमेकांची योग्यता ओळखू शकतात. तो मळके धोतर नेसून माती तुडवत होता ते त्याने बघितले नाही. ह्या सर्व गोष्टींना महत्त्व दिले नाही. त्यांनी त्याचा चेहरा, शरीर यांचेकडे पाहिले नाही, तर त्याच्यामधे देवत्व साकारलेले त्यांनी पाहिले.

सहजयोग्यांनी एकमेकांतील आंतरिक जिव्हाळा वाढविला पाहिजे. मग तुम्ही निरर्थक वरवरच्या गोष्टींकडे लक्ष देणार नाहीत, हे शिव तत्वाचे एक अंग आहे. ते कशाची तमा करत नाहीत. त्यांच्या डोक्यावर गुंतागुंत झालेल्या जटा आहेत. दोन्हीकडे पाय सोडून वेगवान नंदीवर बसून ते लग्नाला निघतात, त्यांच्या बरोबर त्यांचे वऱ्हाडी, कोणी एकच डोळा असलेला, कोणी एकच हात असलेला, कोणी कुबडा, कोणी लंगडा, तरी त्यांची त्यांना तमा नाही कारण त्यांना बाह्य रूपाचे महत्त्व नाही. त्यांना आत्मिक सौंदर्याचे महत्त्व होते. तुम्हाला एकच डोळा असेल किंवा तुमचे शरीर वेडेवाकडे असेल तर त्यांना काही फरक पडत नाही. अशा प्रकारचे सर्वजण त्यांना आपले वाटतात कारण वरवरच्या गोष्टींपेक्षा माणसातील दैवी गुण त्यांना प्रिय आहेत.

ते सर्वव्यापी असल्याने शिव तत्त्व समजून घेण्याचे अनेक मार्ग आहेत. जर तुम्हाला कोणाबद्दल अनुकंपा वाटली तर ती कार्यरत होते. नुकतीच दुर्धर रोगाची एक केस मेक्सिकोमध्ये झाली. यूनोमध्ये काम करणाऱ्या एक मेक्सिकन महिलेने मला दोन पत्रे पाठविली; त्यात तीने तिचा मुलगा भयंकर रोगामुळे दगावण्याची शक्यता असल्याचे लिहिले होते. तिने लिहीलेल्या पत्राने माझे डोळे पाणावले व मला शिवांप्रमाणे तिच्याबद्दल अनुकंपा वाटली. आणि कल्पना करा त्या अश्रुमुळे तो मुलगा बरा झाला. नंतर तीने आभार प्रदर्शनाचे पत्र लिहीले. मला आश्चर्य वाटले कारण माझी अनुकंपा ही मानसिक नाही. ती असते आणि सहजगत्या प्रसारीत होते व कार्य करते.

अशाच प्रकारे तुम्ही सुद्धा होऊ शकता. तुम्हाला माझ्या सर्व शक्त्या मिळाव्यात असे मला वाटते. पण पहिली म्हणजे करुणा. सहज योग्यांनी कोणालाही - सहजयोगी असो अथवा नसो - त्याला वाईट वागविता कामा नये. सहजयोगी आक्रमक नसावा. ते सहजयोग्याचे लक्षण नव्हे. सहजयोगी वेगळा असतो. मी त्या दिवशी सांगितल्याप्रमाणे, मी एका सहज योग्याला म्हटले, "तुम्ही शिघ्रकोपी आहात' तो म्हणाला हो मी आहे, जर कोणी मला चिडवले तर मी चिडतो." मी म्हटले, प्रत्येकजण चिडवल्यानंतरच रागवत असतो. तरी तुम्ही जे रागावता त्यात काही विशेष नाही. चिडवल्यानंतर तुम्ही न रागावता शांत राहता, ती वेगळीच स्थिती होय.

आजच्या आधुनिक युगात सर्व वातावरणात एक प्रकारचा संघर्ष चालू आहे जो शिव - संस्कृतीच्या विरोधात आहे. शिव-संस्कृति म्हणजे सहज संस्कती होय. जर तुम्ही सहजयोगी आहात तर तुमच्यामध्ये करुणा असायला हवी. इतरांच्या भावना समजून घेता यायला हव्यात. दुसरा त्यांचा संभाळ करण्याची तयारी असायला हवी. मग तो दुसरा सहजयोगी असो वा नसो. तरच तुमची करुणा परिणामकारक होईल. हल्लीच्या संस्कृतीतील मोठी समस्या म्हणजे पाश्चिमात्य संस्कृती जी लयाला गेली आहे. जेव्हा तुम्ही वर्तमानपत्र वाचता तेव्हा त्यातील घडामोडी वाचून तुम्हाला धक्काच बसतो. त्यांच्या सर्व नाशाच्या अगोदर किती जणांना हे समजेल हे मला माहित नाही. खरोखर हा आत्मघाताचाच प्रकार होय. एका बाजूला स्वैराचारी व स्वार्थी समाज प्रभावी आहे आणि दुसऱ्या बाजूला इस्लामी संस्कृती त्याच्या विरोधात आहे. पण ज्या मार्गाने ते विरोध करीत आहेत त्या मार्गामुळे समस्या निर्माण होत आहेत जर तुम्ही एखाद्याला हे करू नका. ते करू नका असे सांगितलेत तर तो ते जास्तच प्रमाणात करीत राहील. उत्तर हिंदुस्थानात इस्लामी संस्कृतीचा जास्त पगडा आहे. आणि लोक जास्त स्वैराचारी आहेत आणि सर्व नव्हे तर बरेच लोक हिंदु असूनही स्त्रीयांकडे पहात बसतात. या इस्लाम संस्कृतीमुळे लागलेल्या वाईट सवयी आहेत. जेव्हा स्त्रिया बुरखा धारणकरतात व कोणी त्यांच्याकडे पाहू शकत नाही तेव्हा जास्तच उत्सुकता निर्माण होते. एकजण माझ्याबरोबर प्रवास करताना रस्त्यावरच्या प्रत्येक स्त्रीकडे बघत होते. मी म्हटले, असे केलेत तर तुमची मान मोडून जाईल. पण हे इथे सर्रास चालते. एवढेच नव्हे, तर ही उत्सुकता इतकी शिगेला पोहोचते की लोक पाश्यात्यांप्रमाणे अनितीच्या मार्गाकडे जातात. तुमच्या वासनांचे दमन करणे हेही चुकीचे आहे. ही संस्कृती (दमन) उघडपणे भावना दडपते पण आतुन लोक अनीतिमान असतात. दडपल्यामुळे निर्माण झालेली उत्सुकता ही निरोगी नसते.

सहजयोगात दडपले जाण्याचा प्रश्नच येत नाही. तुमच्यात अबोधिता येते. ही शिवाचे एक तत्त्व होय. ही सहजसंस्कृति मध्यमार्गात असते. त्याच्यामध्ये पराकोटीचा स्वैराचारही नाही पराकोटीचे दमनही (इच्छांचे) नाही. ती मध्यमार्गी आहे व अबोधिता हे शिवांचे परमतत्त्व होय. ही अबोधिता तुमच्यामध्ये प्रकाशत असते. यापूर्वी तुम्ही कसेही असलात तरी मी तुम्हाला शुद्धच मानते. पाश्चात्यांच्या वागण्याच्या मूर्खपणाच्या कल्पना तुमच्याजवळ नाहीत. सहजयोगात आलेले अनेक मुस्लीम लोकसुद्धा आता अगदी सहज झालेले आहेत व ते चांगल्या प्रकारचे आयुष्य जगत आहेत. आपल्याकडील काही इराणी लोकांनी कबुली जबाब देणारी (कन्फेशनची) पत्रे मला पाठवलेली पाहून मला धक्काच बसला. मी ती वाचली नाहीत. कारण हे माझ्या मते फारच होते आणि आता मला ते अत्यंत नीतिमान लोक वाटत आहेत. कोणत्याही एका टोकाला जाणे चूक होय. नीतिमत्ता ही जीवनासाठी फार महत्त्वाची आहे हे समजण्यासाठी सहजयोगात मध्यात असणे उत्तम होय. ती (नीतिमत्ता) तुमच्या अबोधितेतून येते. अबोधिता ही शिवाचे पुत्र श्री गणेश यांचा गुण होय. परंतु ती शिवांच्या अबोधितेतून बाहेर टाकली जाते. म्हणून मुलांमधे गुंतल्यामुळे तुम्हाला चुकीच्या गोष्टी करण्याची इच्छा होते, ज्या तुमच्यासाठी योग्य नसतात. तेव्हा ही नवीन प्रकारची लिप्तता सहजयोगात आल्यावर तुमच्यामधे सुरू होत हे मी बरेच वेळा पाहिले आहे.

मला एवढेच सांगावयाचे आहे की, तुम्ही आश्रमात सुद्धा सामुहिक ध्यान केले पाहिजे. हे तुम्ही करून पाहिले पाहिजे. ती चांगली कल्पना आहे. पण तुम्ही एकमेकांना व्हायब्रेशन्स देऊ नका. इतरांच्या चक्राची काळजी घेण्याचे तुम्हाला कारण नाही. आपल्यामधे काय बिघाड आहे इकडे तुम्ही लक्ष द्या. तुमच्या (प्रगति) उन्नतीसाठी जे आवश्यक असेल ते तुम्ही केले पाहिजे, कारण सर्व जगाची जबाबदारी सहजयोग्यांवर आहे. तुम्हाला माहित आहे की, सहजयोगाशिवाय दुसरा पर्याय नाही. मानवजातीच्या सर्व समस्यांचे निराकरण करण्यासाठी सहजयोग या पृथ्वीवर अवतरला आहे. सहजयोगी म्हणून स्वतःला उत्तम स्थितीत ठेवणे ही तुमची जबाबदारी आहे. पोकळ वल्गना किंवा आक्रमकपणा न करता प्रेम व करुणा यांची गरज आहे.

तुम्हाला देवाचे अनंत आशीर्वाद.

卐

जय श्री माताजी !

# "गुरुपूजा ९५"

## गुरुपोर्णिमा, जुलै ९५. कवेला, इटली (भाषणाचा सारांश)

आजची गुरुपुजा फारच महत्त्वाची आहे, कारण आपण गुरु पूजेची २५ वर्षे पूर्ण करीत आहोत. सहजयोग काय आहे? हे समजून घेण्याचा प्रश्न आहे. हा खरोखरच एकमेव शोध आहे, असे आता मला जाणवते, की जे लोक सत्याचे शोधक होते, त्यांना सत्य सापडले आहे आणि पूर्णपणे (absoutely) त्यांच्या मध्य मज्जासंस्थेवर त्यांना ते मिळाले आहे. काही ठिकाणी जेथे अवघड दिसत होते, तेथे हे कसे घटित झाले, हे कसे कार्यान्वित झाले आणि २५ वर्षांच्या कालावधीत सहजयोगाचा विस्तार आपण कसा काय मिळवू शकलो? मुख्य गोष्ट जी तुम्हा सर्वांना माहित असली पाहिजे, जसे झाड वाढण्यास सुरुवात होते, मुळांना अधिक खोलवर वाढावे लागते आणि खोलवर पसरावे देखील लागते. केवळ पृथ्वी मातेनेच झाडाला पोसले आहे (sustain). असे कधी होत नाही. मुळे ही तुमच्या स्वतःच्या जीवनात आहेत, तुमच्या स्वतःच्या हृदयात आहेत. आपण जेव्हा आम्ही स्वतःचे गुरु बनले आहोत असे म्हणतो, तर आपण खरोखरच आत्मनिरिक्षण करुन स्वतःचे गुरु आहोत अथवा नाही हे शोधण्याचा प्रयत्न करायला हवा. कारण या अगोदर तुमचे मन एका बाजूला होते, तुमचे हृदय दुसऱ्या बाजूला होते आणि चित्त वेगळ्याच मितीमध्ये / अवस्थेमध्ये होते. हे तिन्ही तुम्हांमध्ये गोंधळ निर्माण करीत होते. जर तुम्ही मनुष्य जातीस समजून घेतले तर तुम्हाला आश्चर्य वाटेल की, या तिन्ही गोष्टी वेगवेगळ्या मार्गाने माणसामध्ये कार्य करतात आणि काही वेळेस भांडतात देखील. त्यानंतर आहे तुमची बुद्धी आणि तुमचे मन, दुसरे आहे तुमचे हृदय, तुमच्या जाणीवा आणि भावना, आणि तिसरे आहे तुमचे चित्त. या आधुनिक काळात हा गोंधळ अतिशय वाईट आहे कारण सर्व काळ तुमचे चित्त बाहेर असते ते एखाद्या सुंदर वस्तुकडे, सुंदर स्त्रीकडे, सुंदर पुरुषाकडे सर्व प्रकारच्या मूर्खपणाच्या गोष्टींकडे, शक्ती व्यर्थ घालविण्याच्या एखाद्या पद्धतीकडे असेल. असे चित्त अगदी बेलगाम घोड्याप्रमाणे आहे. तुम्ही असे चित्त नियंत्रित करु शकत नाही. हे चित्त या गोष्टीकडून दुसरीकडे असे धावत असते. ही एक फॅशनदेखील आहे. एक प्रकारची लोकप्रिय गोष्ट आहे, की सतत चित्त भिरभिरत ठेवणे, परंतु हे चित्त जे दिव्यत्त्वाकडे (Divine) असावयला हवे, सर्व शक्तिमान परमेश्वराकडे असावला हवे, ते मात्र भरकटविले जाते.

सर्वप्रथम स्वतःबद्दल शोधले पाहिजे. तुमचे चित्त कोठे जाते? कोणती बाब चित्ताची काळजी घेण्याची, चित्ताशी संबंधित राहण्याची जाणीव निर्माण करेल? पहा वाईट चित्त तयार होते, ते निरनिराळ्या अडचणींमुळे किंवा लहानाचे मोठे होत असताना तुम्हावर नियंत्रण नसल्याने, तुमच्या शिक्षणामुळे, ज्या वातावरणात तुम्ही राहता त्यामुळे अथवा तुमच्या स्वतःच्या अहंकार वा कन्डिशनिंगमुळे (मनाच्या सवयींमुळे) चित्त हे सर्व बाहेरच्या शक्तींशी अथवा निगेटिव्ह ताकदीशी जोडले जाते आणि ते गुंतून पडते, ज्याप्रमाणे एखादी नदी समुद्राच्या दिशेने सरळपणे वाहत असताना, (काठाच्या) नापीक जमिनीत पसरुन समाप्त होऊ शकते. अगदी याच पद्धतीने, हे चित्त जे दिव्यत्त्वाकडे जायला हवे ते भरकटते आणि संपून जाते. अशा प्रकारचे चित्त तुम्हास परमेश्वराकडे (towards Divine) घेऊन जाऊ शकत नाही. सरतशेवटी तुम्हास आढळते ते सर्व चित्त पूर्णपणे शोषले गेले आणि भरकटले आहे. या आधुनिक जगात, तुम्हास माहित आहे की, फारच भ्रांती आहे. अशा भ्रांत अवस्थेत तुम्हास माहिती नाही की अनेक प्रकारच्या गोष्टी तुमचे चित्त आकर्षून घेऊ शकतील आणि चित्ताची शक्ती क्षीण करतील.

असे त्य लोकांबद्दल जास्त घडेल जे अतिशय उजव्या बाजूचे आहेत, तसेच डाव्या बाजूचे लोक देखील अधिक प्रभावित होऊ शकतील. उजव्या बाजूचे लोक एका बिंदुपर्यंत जातात आणि नंतर शुष्क, स्वमताभिमानी आणि आक्रमक बनतात. त्यांचे सर्व चित्त पुढारपण करण्यात असते. तर डाव्या बाजूचे लोक त्यांच्या स्वतःच्या लहरी, इच्छा, मोह यामध्ये खूप गुंतून पडतात. तुमचे चित्त जे सर्वांत महत्त्वाचे आहे ते दोनही (डाव्या व उजव्या) बाजूंमुळे वाया जाऊ शकते. परंतु अशक्त मन आणि अशक्त हृदय असणाऱ्या व्यक्तीला चित्ताचे नियंत्रण करणे जमणार नाही. समजा आता एका बुद्धिमान व्यक्तिस घ्या, बुद्धिमान व्यक्ती स्वतःचे चित्त, दुसऱ्यांचे लक्ष वेधून घेण्यात खर्च करते असे का ते मला माहित नाही. परंतु ही एक स्वतःस सुखाविण्याची पद्धत आहे. असे खूप पुढारीपणा करणारी व्यक्ती दुसऱ्यांबरोबर गोडपणे वागण्याचा प्रयत्नात असते, दुसऱ्यांशी संबंध चांगले ठेवण्यासाठी ज्यामुळे इतर लोक त्याच्याकडे संबंध चांगले ठेवण्यासाठी ज्यामुळे इतर लोक त्याच्याकडे लक्ष देतील. ही फार सुक्ष्म गोष्ट आहे, त्यांना अगदी स्वतःला देखिल हे माहिती नसेल. या आधुनिक जगात लोक अनेक मूर्खपणाच्या गोष्टी करतात ते फक्त दुसऱ्यांचे चित्त वेधून घेण्यासाठी, अनेक फॅड या आधुनिक काळात याचसाठी आली आहेत की काहितरी मूर्खपणाची गोष्ट केल्याने लोकांनी त्यांचेकडे लक्ष दयावे. तुम्ही इतरांचे लक्ष स्वतःकडे वेधून घेण्याचा प्रयत्न करू नये. त्याऐवजी तुम्हास काय करायचे आहे तर अतिशय सूक्ष्म पद्धतीने दुसऱ्यांकडे लक्ष पुरवायचे आहे. अशी कुठलीही अपेक्षा न करता की तुम्ही एखाद्याकडे लक्ष देत आहात, म्हणून त्यानेदेखील तुमच्याकडे लक्ष द्यावे. हा फार मोठा संघर्ष आहे. मी सहजयोगात सगळीकडे पाहिले आहे की लोक प्रयत्न करतात बोलून लोकप्रिय बनण्याचा, अगदी उठून दिसण्याचा, अथवा मोठ्या गुणवत्तेचा असण्याचा आणि आपण इतरांपेक्षा अधिक चांगले आहोत असे दाखविण्याचा जो परमेश्वराशी (Divine) खरोखरच जोडलेला आहे, तो दुसरे लोक त्याच्याकडे कसे लक्ष पुरवितात, याची जास्त काळजी करीत नाही, परंतु आपोआपच अशा व्यक्तीचे चित्त दुसऱ्यांवर असते. हे फार सूक्ष्म आहे. तुम्ही त्याचे तुमच्यावर लक्ष आहे, हे ओळखू शकणार नाही. परंतु ते (अशा व्यक्तीचे चित्त) फार सुंदररीतीने कार्य करते. आपण हे जाणून घेतले पाहिजे की, आता आपण परमेश्वराच्या चित्तांमध्ये आलो आहोत, आपण परमेश्वराच्या राज्यात आहोत, आपण परमेश्वरामध्ये (in Divine) आहोत. आपण खूप शक्तीशाली लोक आहोत, परंतु जर का स्वतःचे चित्त (परमेश्वरापासून) भरकटविले, तर आपण फार अशक्त बनतो. आपण सहजयोगी आहोत असे वाटून घेणे फार सोपे आहे, किंवा आपण दुसऱ्यांना अनेकदा आत्मसाक्षात्कार दिला आहे अथवा अनेक लोकांना आपण मदत दिली आहे. ही सर्व जाणीव तुमच्यामध्ये येते, तेव्हा तुम्ही जाणले पाहिजे की, तुम्ही अजून 'सहजयोगी' म्हणून पूर्णपणे विकसित झालेले नाहीत. अशी जाणीव कधीच असू नये. तुम्ही जे कार्य करीत आहात, जे निर्मिताहात, त्याची बढाई मारण्याची गरज नाही. जाहिरात करण्याची आवश्यकता नाही. तुम्ही कसे आहात, हे प्रत्येकाने पाहिलेच आहे. अगदी अशा प्रकारची इच्छाच असू नये कारण तुम्ही आत्म्याच्या समाधानासाठी ते करीत आहात.

आत्मा हृदयात निवास करतो, हे आपणास माहितच आहे. आता, जेव्हा तुम्हास माहिती होते की, हृदयाने मेंदूवर कार्य करावयास हवे आणि जे कार्य करू शकते, तेव्हा तुम्ही काय बनता? तुम्ही प्रेम आणि करुणेचा स्त्रोत बनता. तुम्ही दुसऱ्यावर अधिसत्ता गाजवत नाही, तुम्ही असे म्हणत नाही की, मी तुझ्यासाठी इतके काही केले आहे, तर तू माझ्यासाठी काय करित आहेस? मी तुमच्यासाठी अनेक मार्गांनी मदत पुरविली आहे आणि तुम्ही मला विसरता आहात आणि माझ्यासाठी काहीच करीत नाही. परतफेडीच्या अपेक्षा जर तेथे असतील, तर तुम्ही जाणले पाहिजे की हे तुमचे मन आहे जे तुम्हाला अशा कल्पना (ideas) देत आहे आणि त्या कार्यान्वित करीत आहे. तर मग तुमचे लक्ष दुसऱ्याने तुम्हास दिलेल्या प्रेमाकडे दया, ज्यावेळी तुम्ही दुसऱ्या व्यक्तीस काही देता हे फार सूक्ष्म आहे.

सहजयोगामध्ये, तुम्ही स्वतःला फक्त प्रेमाचा स्त्रोत म्हणून पाहिले पाहिजे, जो फक्त वाहतो आहे. यात तुम्ही असे म्हणू नका तुम्हास हे हवे आहे, ते हवे आहे, किंवा हे ध्येय गाठायचे आहे, ते बनायचे आहे, ते सर्व आता संपले आहे. एकदा का तो स्त्रोत तुम्ही बनलात तर तुम्ही दुसरे काही कसे बनू शकाल? गोष्ट अशी की, ज्यांना हे दोन्ही मिळते आहे, त्यांना एक प्रकारचे बक्षिस हवे, अथवा विशेष ओळख हवी आहे. ह्या सूक्ष्म प्रकारात, आपणास माहिती हवे की, मन फार चलाख आहे. सहजयोगामध्ये आपणाकडे फार हुशार आणि बुद्धिमान लोक आहेत. परंतु या मनावावात तुम्ही फार सावध राहिले पाहिजे, कारण हे मन तुम्हास फसवू शकते, म्हणून तुमच्या मनास विचारा, तुम्ही सहजयोगामध्ये का आहात? सहजयोगाचा काय उद्देश आहे? हळूहळू हे मन थांबेल आणि मग तुम्ही स्वतःस प्रश्न विचारला पाहिजे, आता माझी स्वतःची काय इच्छा आहे? मी काय मिळवू इच्छितो? मी सहजयोगात का आहे?

जर हे प्रश्न तुम्ही स्वतःस विचारले, तुम्ही पहाल, तुम्ही अगदी विरघळून जाल, तुम्ही अगदी निर्विचार व्हाल. कारण आता कोणतीच इच्छा उरली नाही. कोणती महत्त्वाकांक्षा नाही. कोणती स्पर्धा नाही. हे सर्व मेंदूचे अथवा बुद्धीचे गुण आहेत जे तुम्हास स्पर्धेतून मत्सरी बनवितात. मत्सर स्पर्धा करण्यातून निर्माण होतो. कारण ज्यावेळी दोन किंवा अनेक व्यक्ती स्पर्धा करतात आणि एकाची निवड होते. तेव्हा त्यामुळे आनंदी होण्याऐवजी दुसरे मत्सरी बनतात. जर आपणापैकी एक, काहीतरी बनला आहे, तर आपण आनंदी व्हायला हवे की तो काही बनला आहे. त्याऐवजी दुसऱ्या लोकांना त्याचा द्वेष वाटतो. तोच का म्हणून निवडला, तो कोण आहे, तो स्वतःला काय समजतो? त्यानंतर आपण पुढे जातो. तुम्ही लोक नाही परंतु संपूर्णपणे लोक त्यावरोवर यापुढे जातात, आणि दुसऱ्यांना इजा करतात.

सहजयोगामध्ये काही वेळेस लोक काळजी करतात अथवा घावरतात. काळजी करण्याची किंवा घावरण्याची मुळीच आवश्यकता नाही कारण आता तुम्ही सहजयोगी बनला आहात, आणि स्वतःचे गुरु आहात. कोणीसुद्धा तुम्हास स्पर्श करू शकत नाही. जो कोणी तुम्हास त्रास देण्याचा प्रयत्न करेल तो गळून जाईल अथवा आणखी काही आपणास मुळीच काळजी करण्याची गरज नाही, की कोण तुमची निंदा करतो, ते तुमच्याबाबत काय बोलतात. ते अगदी पूर्णपणे आंधळे लोक आहेत. त्यांच्या शहाणपणाचा विचार करता, ते परिपक्व नाहीत. त्यांना सहजयोग समजून घेणे अशक्य आहे. ते एका ठराविक बिंदूपर्यंत जातील आणि थांबतील कारण त्यांचे स्वतःचे धैर्य, मी म्हटल्याप्रमाणे की, थेंब समुद्र बनतो. पाश्चात देशात कठीण आहे, कारण तेथे असे अनेक लोक आहेत ज्यांच्या स्वतःच्या वेगळ्या कल्पना आहेत, स्वतःची वेगळी ओळख आहे, स्वतःचे आगळे व्यक्तिमत्त्व आहे. शिवाय हा अगदी विरोधाभास आहे की, आपणास लोकांनी असभ्यपणे वागलेले (indecently) चालणार नाही.

डिसेन्सी सभ्यता / मर्यादशीलता हा सहजयोगाचा फार मोठा भाग आहे. कोणी विचारेल की, जेव्हा तुम्ही म्हणता की तुम्ही पूर्णपणे विरघळून गेलेले आहात, तर मग आपणास प्रतिष्ठा (डिग्निटी Dignity) कशाला हवी, प्रतिष्ठेची काळजी कशाला हवी. हा प्रश्न तसा ठीक आहे. उत्तर असे की, समजा पाणीचा एक थेंब समुद्रात टाकला तर संपूर्ण समुद्र मीलन होतो. आपण जर थोडेसे विष समुद्रात टाकले तर संपूर्ण समुद्र विषारी होतो. त्याप्रमाणे समुद्राबाबत तसे परमचैतन्याबाबत जे योग्य नाही, ते करू नये. नाहीतर तुम्ही ते संपूर्ण खराब कराल. आपल्याकडे असे अनुभव आहेत, आपल्याकडे असे सहजयोगी होते, जे लीडर ही होते, ते वेडगळपणे वागले, आणि संपूर्ण सामुहिकता विघडविली. (spoiled) जी व्यक्ती चांगली नाही ती संपूर्ण सामुहिकता विघडवू शकते. याच्यावर जर तो लीडर असेल तर त्याहून वाईट म्हणून प्रत्येकाने हे समजून घेतले पाहिजे की, तुम्ही या समुद्राचे थेंब बनला आहात आणि हा शुद्ध प्रेमाचा सागर आहे. यामध्ये तुम्ही अशी कोठलीही गोष्ट करू नये. जी विष निर्माण करेल अथवा ते मोडून टाकेल. अगदी काही वेळेस ते या सागराची वेडीवाकडी (Gotesque) प्रतिमा निर्माण करू शकेल आणि म्हणूनच आपणास भारदस्त (Decent) लोक व्हायचे आहे याचा अर्थ असाही नव्हे की, आपणास (वाह्यतः) टिप-टॉप (dandy people) लोक व्हायचे आहे किंवा आणखी काही परंतु तुम्ही देहाचा आदर ठेवला पाहिजे. स्वतःचा आदर असला पाहिजे. तुमचे व्यक्तिमत्त्व आदरणीय असायला हवे. त्यामध्ये अधिक गुंतुन जाणेदेखील ठीक नाही. परंतु ते अशी हवी तुम्ही स्वतःचा आदर ठेवला पाहिजे ते फार महत्त्वाचे आहे जर तुम्ही स्वतःचा आदर करू शकत नसाल तर, तुमच्यातील परमशक्तीचा ही आदर करू शकणार नाही हे परमचैतन्याच्या सजावटी सारखे आहे, तुमचे वागणे, तुमचा पोषाख अशा प्रकारे असला पाहिजे की, लोकांना समजले पाहिजे की तुम्ही डिसेंट व्यक्ती आहात. असभ्य (indecent) अशा गोष्टी बाहेर आल्या आहेत आणि रोजच्या फॅशनस् बनल्या आहेत आणि त्या व्यावसायिकांकडून एका पाठोपाठ येत आहेत. लोक व्यावसायिकांच्या हातात खेळत राहतात. परंतु जर तुम्हाला माहिती असेल की, तुमच्यासाठी काय योग्य आहे, आज कोणता ड्रेस तुम्हास घालायचा आहे. एकदाच सगळ्या गोष्टींसाठी तुम्ही ठरविले पाहिजे. आता चित्त अशा गोष्टींमध्ये वाया घालवू नये की आज मी हा ड्रेस घालणार उद्या त्या प्रकारचा ड्रेस घालणार कारण यामुळे चित्त खराब होते. जर ती भारदस्त (प्रभावी) गोष्ट आहे तर ती पूर्णपणे ठीक आहे आणि ती तुम्हाला स्वतःमध्ये भारदस्तपणा जाणवून देईल. आधुनिक काळात, लोकांना स्वतःचा आदर नाही. तुम्ही पहा, अगदी उच्च पातळीवरचे लोक सर्व प्रकारच्या मूर्खपणाच्या गोष्टी करीत आहेत, अतिशय अनादरणीय लोकांशी संबंध ठेवून आहेत. वर्तमानपत्रात पाहिल्यास हे सर्व तुम्हाला असल्याचे दिसेल. तुम्हास धक्का बसला असेल की, हे लोक विविध प्रकरणांमध्ये गुंतलेले कसे आहेत. कारण अजून सुद्धा ते पुरेसे परिपक्व झालेले नाहीत, जेथे तुम्हास समजेल, ते कोठे आहेत, त्यांची जागा काय आहे? आणि त्यांनी कसे असावयास हवे. जर तुम्ही परिपक्व झालेले असाल

तुम्हाला समजेल की, मी एक गृहिणी आहे, मी असा मंत्री आहे मी प्रधानमंत्री आहे, मी कसे असावयास हवे. ही सर्व कमाई बाहेरच राहते, ती आत उतरत नाही. परंतु सहजयोग्यास ती आतमध्ये दिसावयास हवी ती पूर्णपणे तुमच्यात असावयास हवी, ज्यामुळे हे समजेल की चित्त खूप वाया गेलेले नाही.

दुसरा भाग पहावयास हवा तो म्हणजे हृदय. काही लोक म्हणतात, माताजी जर आमचे हृदय मेंदूवर राज्य करेल तर, आम्ही अतिशय भाऊक बनतो, आम्ही लोकांशी खुपच चिकटले जातो. आम्हास वैयक्तिक मैत्रीसंबंध अथवा तत्सम गोष्टी मिळतात. यावेळी प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे की, तुम्ही त्या व्यक्तींमध्ये का गुंतता ते तुमचे हृदय नव्हे. तुम्ही त्या व्यक्तींशी गुंतले जाता कारण त्याच्याशी एक प्रकारचे तुमचे संबंध असतात. तुम्हास त्याची केशरचना आवडली असेल, काहीतरी बाहेरची गुणवत्ता तुम्हाला त्याच्याकडे आकर्षित करीत आहे ही आतील विशेषता नाही की तुम्ही जोडले आहात. उदाहरणार्थ, जर तुम्ही तुमच्या मुलांत गुंताल तर, तुम्ही त्यांना बिघडवून टाकाल. ते तुमच्या अपेक्षांपर्यंत येणार नाहीत. जो कोणी गुंतला जातो, त्यावेळी तुम्ही खात्री करावयास हवी, तुम्ही अशा व्यक्तींमध्ये का गुंतला आहात? याचे कारण आहे? आता, सहजयोगामध्ये लोक एकमेकांशी खूप जोडले गेलेले आहेत. मला ते माहिती आहे, परंतु ते कोणत्याही बाह्यकारणासाठी नाही, की एखादा श्रीमंत आहे, एखादा प्रसिद्ध आहे, कोणी फार विशेष कार्य करीत आहे. ते त्या व्यक्तीशी जोडले आहेत कारण त्याकडे चैतन्याचा साठा आहे, त्या व्यक्तीशी जोडले आहेत कारण त्याकडे चैतन्याचा साठा आहे, जो तुम्हास शांतता देतो, आनंद देतो आणि एक प्रकारचे मानवजातीचे अमर्याद (immense resolution) पृथक्करण देतो. ते अशा प्रकारे घडते जेव्हा तुम्ही त्या पातळीवर पूर्ण असता. मी तुम्हाला एका कुंभाराची गोष्ट सांगितली आहे. गोराकुंभार हा एक कुंभार होता तर नामदेव एक शिंपी आणि अतिशय चांगला प्रसिद्ध कवी होता. ते दोघेही कवी होते. नामदेव या गोरा कुंभाराकडे गेले कारण तो फारच आदरणीय कार्य करीत होता. त्यावेळी तो माती तुडविण्यात गुंतला होता. नामदेवाने त्याच्याकडे पाहिले आणि तो म्हणाला, मी येथे निर्गुण पाहण्यास आलो आणि इथे तर निर्गुणच सगुण रूपात दिसते आहे. हे फक्त दोन समान पातळीवर असणाऱ्या संतामध्येच शक्य आहे की ज्या पद्धतीने ते एकमेकास पसंत करताना जाणून घेतात. मला जे म्हणायचे आहे, त्यासाठी शब्द नाहीत, परंतु ज्या पद्धतीने त्यांना एकरूपत्व जाणवले, ते फारच सूक्ष्म आहे. जर तुम्हाला अशी एकमेकांबद्दल जाणीव असेल तर तुम्ही पूर्णपणे विरघळले आहात आणि आनंदाच्या सागरात आहात. याउलट जे काठावर बसले आहेत, त्यांना या पद्धतीने जाणवणार नाही. ते दुसऱ्या व्यक्तीमध्ये काय दोष आहेत ते शोधून काढण्याचा प्रयत्न करत असतात. ते दुसऱ्यास कधीच पसंत करणार नाहीत. त्यांना असे वाटते की जणू त्यांना दुसऱ्यांना नावे ठेवण्याचा अधिकार आहे, दुसऱ्यांचे दोष शोधण्याचा अधिकार आहे आणि असे की ते काही तरी विशेष आहेत आणि मग दुसरी व्यक्तीसुद्धा ह्या व्यक्तींचे दोष शोधते ही दोष शोधणारी एक सोसायटीच आहे. मला म्हणावे लागेल आणि तुम्हाला त्याचा वीट येतो. परंतु जेव्हा तुम्ही दुसऱ्या व्यक्तीस, जी संत आहे, पाहता तेव्हा तुम्हांस असे प्रेम जाणवते, एकरुपता जाणवते, एक उत्स्फुर्त भावना जी पूर्णपणे शुद्ध असते. तेथे कोणतीच अपेक्षा नाही. तेथे कोणतीच बौद्धिक कृती नसते की त्या व्यक्तीमध्ये काय दोष आहेत. तेथे कसलेच जजमेंट नसते की तो कसा आहे. परंतु फक्त त्या व्यक्तीशी तादात्म्य असते. तुम्हाला जाणवेल की तुमच्या प्रेमाच्या गुणवत्तेला एक नवीन झळाळी आली आहे, नवीन डायमेन्शन (मिती) आली आहे. आपण दुसऱ्यास स्वतःमध्ये कसे पसंत करतो, तर ते आपल्या प्रेमातील शुद्धतेमुळे जेव्हा तुम्ही शुद्ध असता, शुद्धता अशी की तुम्ही कोणत्याही गोष्टीस चिकटलेले नसता. परंतु निरासक्तता मध्ये तुम्ही आनंद घेता. आसक्तीमध्ये तुम्ही आनंद घेऊ शकत नाही. कारण त्यामध्ये तुम्ही दुसऱ्यांबरोबरच्या वरकरणी संबंधाची चिंता करता.

आता विस्तृत दृष्ट्या सहजयोगी खूपच महत्त्वाचे लोक आहेत कारण अध्यात्म्याच्या इतिहासात इतके संत एकत्र कधीच नव्हते. अनेक देशाचे, अनेक लोक परमशक्तीचा आणि नैतिकतेचा विचार करीत आहेत. एकाच बिंदूवर एकत्रित असणारे इतके लोक मिळणे कधीच शक्य नाही. जे आपसात एकरुपता अनुभवतात, एकमेंकासाठी आपुलकीची भावना अनुभवतात. जे लोक खरोखरच संत असतात, जे दुसऱ्या संतावरोबर, संताप्रमाणे असणाऱ्या लोकांबरोबर पूर्णपणे आनंदी असतात. ते संताकडे धाव घेतात. मी कोल्हापूरात असताना असे माझ्या बाबतीत घडले ते असे की, त्यांनी मला सांगितले, येथे एक सत्पुरूष आहेत, जे तुमच्याविषयी सांगतात. त्यांनी सांगितले, ते टेकडीवर राहतात, आणि ती चढण्यासाठी कमीत कमी तीन तास लागतात. ते तेथेच राहतात, बाहेर येत नाहीत. मी म्हटले ठीक आहे. मला तेथे जाऊन त्यांना भेटणे आवडेल म्हणून मी

चालत निघाले आणि पाऊसास सुरुवात झाली . सहजयोगी म्हणाले , "माताजी तुम्ही अशा कोणाकडे जात नाही . मग तुम्ही त्यांच्याकडे का जात आहात ?" मी म्हटले , "नाही , मला फक्त तेथे जाऊन त्यांना भेटायचे आहे . ते म्हणाले , या व्यक्तीचे पर्जन्यावर नियंत्रण होते . परंतु पाऊस खूपच वेगाने पडत होता आणि मी पूर्णपणे भिजून गेले . जेव्हा मी तेथे पोहचले तो तेथे बसला होता आणि रागाने थरथरत होता . मी म्हटले , "आपण गुहेत बसू या ." ती व्यक्ती नॉर्मल मूडमध्ये नव्हती . म्हणून मी गेले आणि गुहेत जाऊन बसले आणि तो तेथे आला . तो चालू शकत नव्हता कारण त्याचे पाय पूर्णपणे निकामी (lame) बनले होते . ते व्हायब्रेशन्समुळे जी त्यांच्यात खूपच होती . ते काही असो , तो चालू शकत नव्हता म्हणून त्यांनी त्याला आत आणले . पहिली गोष्ट त्याने मला विचारली , "तुम्ही मला पाऊस का थांबवू दिला नाही ? ज्यावेळी तुम्ही वरती येत होता , तेव्हा इतका जोराने पाऊस पडत होता आणि मला तुम्हाला भिजू द्यायचे नव्हते . आता तुम्ही पाण्याने पूर्ण भिजला आहात आणि मला तुम्हाला असा त्रास होऊ द्यायचा नव्हता . कारण ते तुमचे योग्य स्वागत नव्हते . तुम्ही हे माझा अहंकार उतरविण्यासाठी केले ना ? मी नक्कीच अहंकारी बनलो असणार कारण मी पावसावर सत्ता चालवू शकतो . मी त्याच्याकडे पाहून स्मित केले आणि म्हटले , "पहा , तू माझा मुलगा आहेस , हो ना ? आणि तू माझ्यासाठी एक साडी आणली आहेस . परंतु तु संन्याशी आहेस , मी संन्याशाकडून साडी घेऊ शकणार नाही . कारण संन्याशी धर्म हा वेगळा आहे आणि मी गृहस्थ आहे . म्हणून मी जाणीवपूर्वक भिजले की ज्यामुळे तु मला ही साडी देऊ शकशील ." संपूर्ण राग , संपूर्ण अनैसर्गिक वागणे गळून गेले आणि तो खूपच गोड बनला . मग तो मला म्हणाला , "मी साडी आणली आहे , हे तुम्हास कसे माहिती ?" मी म्हटले , "प्रेमामध्ये सर्व गोष्टी समजतात ," नंतर त्याने माझ्यासाठी साडी आणून दिली आणि आरती केली आणि सर्व काही परंतु तुम्ही पहा की , प्रेम कसे सर्व गोष्टी सहजपणे वश करते . लहान सहान गोष्टीत जर प्रेम व्यक्त करण्यास तुम्ही सराईत असाल तर ते कसे कार्यान्वित होते . सर्वात महत्त्वाची गोष्ट आपणास आपल्यामध्ये पहायची आहे ती म्हणजे आपण एकमेकांवर प्रेम करतो का ? आपणास खरोखर दुसऱ्यांबद्दल जिव्हाळा आणि करुणा आहे का ? अगदी जे सहजयोगी नाहीत त्यांच्यासाठी सुद्धा . जे लोक सहजयोगी नाहीत ते आंधळे आहेत . तुम्हाला जाणवले पाहिजे की हे लोक किती उदास आहेत आणि जे सहजयोगात येऊ शकत नाहीत , जे सहजयोगी बनू शकत नाहीत आणि केवळ ते त्यांच्या अहंकारामध्ये समाधानी आहेत . तुम्हांकडे त्यांच्यासाठी खरोखरची करुणा असावयास हवी किंवा जर अशी करुणा तुमच्याकडे आहे तर तुम्हास इतर लोकांनी सांगितले असेल की , तुम्ही स्वतःची एनर्जी का खर्च करीत आहात ? वास्तविक , करुणा ह्या सर्व गोष्टी आपणामध्ये एकटविते . तो जोडणारा भाग आहे . प्रथम तुमचे चित्त आणि दुसरे तुमची बुद्धी किंवा तुम्ही त्यास मन म्हणून शकता आणि तिसरे हृदय . ते सर्व काही वेळेला किंवा बऱ्याचदा एकत्रित होतात . एकदा का तुमच्याकडे करुणा असण्याची क्षमता प्राप्त झाली की तुम्ही कोणाशीही भांडणार नाही . तुम्हाला त्याच्याविषयी विचार करण्याची आवश्यकता नाही . तुम्हास अगदी घरामध्ये असल्यासारखे वाटेल जेव्हा तुम्ही करुणामय असाल आणि ह्या करुणेने तुमचे दुसऱ्यांशी चांगले संबंध असतील .

करुणा ही अभ्यासता येत नाही किंवा काही करून मिळविता येत नाही अथवा चलाखीने येत नाही ती फक्त तेथे असते . त्या करुणेत ती क्षमा करते , सर्व मुर्खपणाच्या गोष्टी विसरते . क्षमा केवळ त्यावेळी शक्य होईल जर तुमच्यात करुणा असेल . आता , अजून काही सहजयोगी आहेत जे मला विचारतात , "माताजी , आम्हास प्रेम आणि करुणा कशी मिळविता येईल ?" आता सोपी गोष्ट अशी की जर ध्यानामध्ये तुम्ही जाणीवेतली निर्विचार अवस्था विकसित केली . तुम्ही निर्विचार अवस्थेत कोणत्याही गोष्टीचे निरिक्षण करा , निर्विचारितेत कोणते ही नाते संबंध पहा , तेव्हा तुम्ही आश्चर्यचकित व्हाल , की कशा रीतीने करुणेची कवाडे उघडतात . निर्विचार अवस्था तुमचे हृदय उघडते . परंतु तो एका व्यक्तीकडून दुसऱ्याकडे जात नाही तर तुमच्या सर्व बाजूंनी प्रकाश दाखविते . प्रत्येकास फायदा मिळतो आणि सर्वांना तुमच्याबद्दल दिव्य भावना (Divine feeling) असते . कारण ही करुणा रेखीय (linear) नाही , ती आक्रमक नाही , परंतु ती फक्त वाहत असते , संथपणे आणि प्रत्येक गोष्ट ठीक करते , जी भ्रांती निर्माण करते , जी अडचणीची आहे आणि जी त्रासदायक आहे . तुम्हास हे करायचे आहे . हेच फार काळापूर्वी संतांनी केले . परंतु कोणालाच ते आवडले नाहीत आणि त्यांना मत्सरामुळे क्रुसावर चढविले . कारण जर कोणी संत बनू शकले , तर लोक त्या व्यक्तीचा द्वेष करतात , म्हणून लोकांनी त्यांना ठार मारले , त्रास दिला आणि अडथळे आणले आता परिस्थिती इतकी वाईट नाही . अर्थातच काही निरुपयोगी लोकही आहेत . अजूनही असे लोक आहेत जे अगदी राक्षस आहेत . त्यांच्याविषयी विसरून जा . परंतु संपूर्ण जगाकडे पाहताना

आपला दृष्टिकोन असा असावा की हे लोक आंधळे आहेत. एखाद्याकडे पाहताना, त्याच्यात काही दोष असतील किंवा त्याचा स्वभाव चांगला नसेल, परंतु तुमच्या हृदयात कसलीही आकस (नाखुषी) असता कामा नये. दुसऱ्यांबद्दल तुमची कसलीही तक्रार असू नये. तुम्ही त्याबाबत त्या व्यक्तीशी बोलू शकता. तुम्ही त्यास हे अशा पद्धतीने सांगू शकता की जेणे करून तो ग्रहण करेल. परंतु त्यापासुन तुम्ही फर्मान देण्याचा प्रयत्न करू नये अथवा कोणत्या प्रकारे त्रास देऊ नये, त्रस्त करू नये, सहजयोगामध्ये आपण पाहिले आहे. जे लोक आले आणि त्रासदायक होते. आपणासाठी कोणत्याच योग्यतेचे नव्हते, स्वतःच बाहेर फेकले गेले. आपणास त्यासाठी वेगळी काही करावे लागले नाही ते फक्त एक प्रकारच्या त्रासदायक जीवनात वाहून गेले. येथे फार मोठी निवड चालू आहे. परमेश्वर अशा लोकांची निवड करीत आहे, जे त्याचे आशीर्वाद घेण्यास योग्य आहेत. ही गुरुकिल्ली तुम्ही मिळविली पाहिजे. त्यासाठीच तुम्ही सहजयोगात आला आहात. बाकीचे काहीच महत्त्वाचे नाही जे काही लोक अगदी उच्च जागांवरती आहेत., उद्या ते धुळीत जातात. जे लोक आज खुप प्रसिद्धीच्या शिखरावर आहेत, ते धुळीत जातात. हे सर्व तुमच्यासमोर घडते आहे. रोज तुम्ही वर्तमानपत्र वाचता आणि ते कसे वागतात ते पाहता. त्यांना स्वतःची कसलीच किंमत नसल्याने, ते फक्त त्यांच्या अहंकाराबरोबर राहतात आणि मी असा तसा मोठा मनुष्य आहे असा विचार करतात. ते वेगळ्या तऱ्हेने चालतात, वेगळ्या पद्धतीने बोलतात आणि एकदम खाली घसरतात. त्या व्यक्तीस याची काहीच जाणीव नाही, लोकांनी त्याचा का आदर केला. तुमच्या बाबतीत मात्र तुम्ही जाणिवेत असावयास हवे की तुम्ही सहजयोगी आहात. जर तुम्ही समुद्र बनला आहात, त्याचा असा अर्थ मुळीच होत नाही की, तुमची चेतना लोप पावली आहे, तर ती विस्तारीत झाली आहे. तुम्हांस समुद्राची चेतना (जाणीव) मिळाली आहे. तुम्ही असे लोक नव्हेत, जे मेस्मराइजड केले आहेत, असे लोक ज्यांचा स्वतःशी काहीच संबंध नाही. याउलट तुम्ही या अगोदपेक्षा अधिक प्रभावीपणे स्वतःशी जोडले गेले आहात. म्हणून ज्यावेळी तुम्ही समुद्र बनता त्यावेळी तुम्ही तुमचे व्यक्तीमत्त्व गमावित नाही, तर तुमचे व्यक्तिमत्त्व विस्तारते. तुम्ही मोठे लोक होता. सहजयोगात हे घडत आहे तुम्ही काहीही करीत असा, तुमचा कोणताही व्यवसाय असो, तुमची कोणतीही जीवन पद्धती असो, हे सर्व बाहेरचे आहे, चित्त सर्वशक्तीमान परमेश्वरापासून विचलित होता कामा नये. ते (चित्त) जर गमावले, तर तुम्ही हरवून जाता. यासाठी नामदेवाची फार सुंदर कविता आहे. एक मुलगा पतंग उडवित होता. पतंग आकाशात तरंगत होता आणि मुलगा त्याची काळजी घेत होता. जरी तो प्रत्येकांबरोबर गप्पा करीत असला तरी त्याचे चित्त त्या पतंगावर होतो. ते पुढे जाऊन सांगतात एका स्त्रीने कमरेवर मुलाला घेतले आहे. ती घर झाडते आहे. केरसुणीने झाडते आहे तिला इकडून तिकडे फिरावे लागते आणि झाड्यानंतरही बरीच कामे तिला करायची आहेत. परंतु मुलगाही आहे आणि तिचे लक्ष त्या मुलांवर आहे, की तो पडू नये. अन्य काही घडू नये. जरी ती सर्व कामे करीत असली तरी तिचे लक्ष त्या मुलावर आहे. अगदी त्याचप्रकारे तुमचे चित्त कुंडलिनीच्या दिव्यशक्तीकडे असावयास हवे. पुढे असे वर्णन आहे की, बऱ्याचशा स्त्रिया नदीवर पाणी घेऊन घराकडे येत आहेत. काही वेळेस त्यांच्या डोक्यावर तीन भांडी असतात आणि त्या चालत असतात. चालताना त्या एकमेंकीशी बोलत आहेत. गप्पा गोष्टी सांगताहेत, परंतु त्यांचे चित्त मात्र डोक्यावर असणाऱ्या मटक्यावर आहे. अगदी त्याच पद्धतीने आपण काहीही करीत असलो तरी आपले चित्त कुंडलिनीवर असायला हवे. आपणकाय करतो आहोत ते स्वतःस माहिती हवे. तुमच्या जीवनाच्या प्रत्येक कोपऱ्यात हा प्रकाश आहे. तुमच्या विचाराचा प्रत्येक रोख (aspect) कोठलेही कार्य, तुम्ही आश्चर्यचकित व्हाल, जर तुम्ही तुमच्या चित्ताचे निरीक्षण केले, तुम्हाला खरोखर तुम्ही काय करीत आहात हे माहिती होईल. चित्ताचे अतिशय निरिक्षण केले पाहिजे, की सरतेशेवटी तुम्हाला जाणवेल की तुमचे चित्त आता भरकटत नाही.

तुमच्या चित्ताशिवाय तुम्ही सहजयोग कार्यान्वित करू शकणार नाही. सहजयोगाची सर्वात मोठी अडचण आहे. तुमचे चित्त सर्व शक्तिमान परमेश्वराकडे असावयास हवे. नाहीतर काहीच कार्यान्वित होणार नाही. तुमचे उत्थान कार्यान्वित होऊ शकणार नाही. जर सहजयोगात तुम्ही पैसा कमविण्यासाठी आला आहात, ठीक आहे, कमवा आणि चालते व्हा. (get out) जर तुम्ही स्वतःचे ज्ञान दाखविण्यासाठी आला आहात, तर दाखवा आणि चालते व्हा. जर तुम्ही तुमची ताकद आणि अधिकार दाखविण्यासाठी आला आहात, तर दाखवा आणि चालते व्हा. त्याप्रमाणे अनेक लोक निघून गेलेले आहेत. सहजयोगाचा वापर अशा मूर्खपणाच्या गोष्टी करण्यासाठी करू नका, ज्या शाश्वत नाहीत, ज्या चिरंतन नाहीत. सहजयोग फक्त स्वतःस स्वच्छ शुद्ध करण्यासाठी वापरला पाहिजे, प्रेमाचा सागर बनण्यासाठी उपयोगात आणला पाहिजे.

अनेक लोकांना वाटते, प्रेम हे फार कठिण आहे,

कारण तुम्हास दुसऱ्याकडून त्रास होऊ शकेल किंवा कोणी तुमचा फायदा घेऊ शकेल. प्रेमाबद्दल सर्वात महत्त्वाची गोष्ट ती म्हणजे जर ते शुद्ध प्रेम नसेल तर ते प्रश्न निर्माण करते. समजा, जर तुम्ही एखाद्यावर विश्वास ठेवला, पैशामुळे नातेसंबंधामुळे किंवा तुम्ही त्यात गुंतल्यामुळे आणि सरतेशेवटी तुम्हाला आढळेल की ते फार निराशाजनक आहेत. परंतु समजा जर तुम्ही त्या व्यक्तीस अगदी शुद्ध भावनेने प्रेम दिले. ते फार सूक्ष्म आहे, ते तुमच्या आतमध्येच निर्माण झालेले आहे. ते तेथेच आहे, आपणास फक्त ते उघडायचे आहे. प्रत्येक मानव हा प्रेमाचा साठा आहे. परंतु फक्त शुद्ध प्रेमात असा सुंदर प्रकाश आहे जो तुमचे रक्षण करतो, मार्गदर्शन करतो आणि तुमचे संपूर्ण जीवन प्रकाशित करतो. हा प्रकाश पोसला जातो, आणि आपण असेही म्हणू शकतो की, दिव्याला तेल असावे लागते. ते आपल्या अध्यात्मिक उन्नतीसाठी तुम्ही प्रेमाची साक्षात मूर्ती (प्रतिमा) आहात कारण तुम्ही मानव आहात. अगदी जनावरांना सुद्धा प्रेम म्हणजे काय ते माहिती नसते. पहा, जर तुम्ही वाघावर प्रेम केले. तो कधीच इजा करणार नाही जर तुम्ही सापाला प्रेम दिले. तो कधीही इजा करणार नाही. जर तुम्ही एखाद्या अतिशय दुष्ट आणि वाईट व्यक्तीशीही प्रेमाने वागण्याचा प्रयत्न केला तर हळूहळू तो शांत होईल तो तुम्हाला थोडीशी इजा करेलही, परंतु हळूहळू तुम्हास आढळेल, प्रेम काम करते, काम करते आणि काम करते. सरतेशेवटी तुमचे प्रेमच त्या व्यक्तीसाठी महत्त्वाचे असेल तुमचे प्रेम अगदी खरोखरच अबोध लोकांकडून अधिक स्वीकारले जाते. मुलांना प्रेम म्हणजे काय ते माहिती असते. जर तुम्हास पाहून मुले पळून जात असतील, तर समजा तुमच्यात काहीतर गडबड आहे. अबोध लोकांची पारख सर्वात चांगली असते. याचा अर्थ असा की, त्यांच्या अबोधितमध्ये, कोणाजवळ प्रेम आहे आणि कोणाजवळ नाही, पारखण्यात ते तरबेज असतात. ते सर्वात चांगले लोक असतात कारण तेच तुम्हाला अधिक चांगल्या रीतीने स्वीकारतात. ते समजून जातील की, हे लोग उच्च गुणवत्तेचे आहेत. परंतु जर लोक अबोध नसतील, जसे काही लोक खुपच धूर्त असतात, हा त्यांचा बौद्धिक भाग असतो, ते तुम्हास कधीच स्वीकारणार नाहीत. त्यांना काहीतरी अतिविशेष (abnormal) गोष्टी स्वीकारणे आवडते, ज्या परमेश्वरी शक्तीच्या दृष्टिकोनातून अतिशय फुटकळ किंवा विचित्र आहेत. एका ठराविक पॉइंट पर्यंत ते स्वीकारतीलही, परंतु पूर्णताः कधीही नाही.

तुम्हाला स्वतःची योग्यता ओळखायची आहे. तुम्हास माहिती असले पाहिजे. तुम्ही कोणाशीही कठोर नाही. तुम्ही इतरांना पारखत नाही आणि मानव म्हणून त्या व्यक्तीत जे काही चांगले आहे ते स्वीकारत आहात. हे कार्यान्वित होते. तुम्ही पाहिले आहे हे सर्व माझ्या प्रेमातून आणि करुणेत कार्यान्वित होते. परंतु मलाही जाणीव नाही की, मी तुम्हाला प्रेम, करुणा किंवा आणखी काही देते आहे. मला अगदी ही सुद्धा जाणीव नाही की, मी तुम्हाला काही देते आहे आणि मी असे सुंदर लोक तयार केले आहेत. मला याची जाणीव नाही. ते फक्त घडते. जसे इथे एक वृक्ष आहे तो काय आहे याची त्याला जाणीव नसते. तो कसा दिसतो आणि का आहे तो फक्त तेथे आहे. अगदी त्याच प्रकारे जर तुमच्या बाबत घडले तर तुम्ही सर्वांसाठी अशा प्रकारच्या आनंदाचा स्त्रोत बनाल.

आता आपणास ह्या जगासाठी काय करायचे आहे? ह्या विश्वासाठी काय करणे आवश्यक आहे. लोक शांततेबद्दल बोलत असतात, हे आणि ते असे काही करण्याची आवश्यकता नाही. ते एवढेच आहे की तुम्ही असे व्यक्तिमत्त्व बना की, जे दुसऱ्यासाठी शांतात, प्रेम आणि आनंद उत्सर्जित करते. ही शक्ती तुमच्यात आहे कारण ती तुमच्या आतच निर्मिली आहे. ती प्रत्येक व्यक्तीत शक्तीसाठ्याप्रमाणे (inpotential form) आहे. फक्त ती बाहेर काढावयास हवी ती कोठल्याही विकाराने नाही, तर तुमच्या आत मध्ये असणाऱ्या प्रेमभावनेने. तुमच्यातच असणाऱ्या अशा सूक्ष्म गोष्टी वर्णिण्यासाठी शब्द नाहीत. कारण आता पर्यंत लोकांना माहितच नव्हते, अशा कोणत्या गोष्टी आहेत ज्यामुळे तुम्हाला दुसऱ्याबरोबर एकरुपत्व जाणवेल. हे सर्व तुमच्याबाबत अगदी सहज घडू शकेल, जर तुम्ही समजून घेतले की, तुम्ही हे मन नव्हे, शरीर नव्हे, चित्त नव्हे तर आत्मा आहात. त्यानंतर आत्मनिरिक्षण करा. मी आत्मा आहे का? नर मी आत्मा आहे तर मी काय करीत आहे. एकदा का तुम्ही आत्मा बनला, तुम्हास वाटते, दुसऱ्यांनी पण का ते बनू ये? फक्त करुणेमुळे, लीडर किंवा दुसरे काही बनण्यासाठी नव्हे. फक्त प्रेमापोटी मी जर आत्मस्वरुप आहे, तर दुसऱ्यांना का तसे बनवू नये? अशा प्रकारचे सहजयोग इतका पसरला आहे आणि म्हणून आपणांकडे असे रत्नांसारखे लोक आहेत. इतके सुंदर लोक की माझ्या जीवनकाळात हे घडू शकेल याची मला अपेक्षादेखील नव्हती. ते कोणत्याही संताबाबत, कोणत्या अवतरणाबाबत या दृष्टचाबाबत घडले नव्हते.

राधा आणि कृष्णाची एक कथा फारच सुंदर आहे. ज्यात राधाने विचारले, या बासरीला तुम्ही ओठाशी का घेता.

कृष्ण म्हणाले, "बासरीलाच का नाही विचारत." ती बासरीकडे जाऊन विचारते, "श्रीकृष्ण तुला कायम ओठाशी का घेतात?" बासरी म्हणाली, "असे पहा, मी पूर्णपणे पोकळ बनली आहे. माझ्या आतमध्ये काहीही नाही. श्रीकृष्ण मला ओठावर ठेवतात आणि लोक म्हणतात माझ्यातून स्वर बाहेर पडतात परंतु धुन तो वाजवित असतो. मी आहे कोठे? मी तेथे नाही मी ही त्या वाजणाऱ्या धुनचाच आनंद घेत असते." हीच ती भावना. तुम्हाला बासरीप्रमाणे बनायचे आहे म्हणजे आतमध्ये पोकळ बनायचे आहे. ह्या सर्व लहान सहान गोष्टी ज्या तुमच्या आयुष्यात येतात, त्या महत्त्वाच्या नाहीत. काय महत्त्वाचे आहे तर ते तुम्ही पूर्णपणे पोकळ बनला आहात का? या ठिकाणी तुम्हाला आत्मपरिक्षण मदत करेल. जो बासरी बनवितो, तो सुद्धा तुमच्या आतमध्ये आहे, म्हणून तुम्हाकडूनच तुमच्यामधून अशी बासरी बनविली जाऊ दे. अशा पद्धतीने तुम्ही जे असावयास हवे ते स्वतःस बनवाल. गीतेत श्रीकृष्णांनी म्हटले आहे, आत्मा स्वतःकडूनच समाधान पावतो. हे समजण्यास फारच कठीण आहे, की आत्मा कसा समाधान पावतो. परंतु आता तुम्हाला मात्र श्रीकृष्णांनी सांगितलेले समजून येईल की, आत्मा स्वतःकडूनच कसा समाधान पावतो. त्यानंतर त्यास कोणत्याच समाधानाची आवश्यकता नसते. तुम्ही फक्त आत्म्याचा आराम पाहता तुम्ही आत्म्याची सुंदरता पाहता. तुम्ही केवळ पाहतच नाही तर तो स्वतःकडून आत्म्याच्या आनंदाने भरलेला असतो आणि तो फक्त आत्म्याकडून समाधानी होऊ शकतो. हे आरशातील (reflection) प्रतिबिंबासारखेच आहे. ज्यावेळी तुम्ही आरशाकडे पाहता, तुम्हास स्वतःचे प्रतिबिंब दिसते परंतु जर आरसा ठीक नसेल, मी म्हणेन मी समाधानी झाले नाही, तुम्ही स्वतःची चांगली प्रतिमा मिळविण्याचा प्रयत्न कराल. अगदी त्याचप्रकारे आत्मा जो तुमच्यात प्रतिबिंबित झाला आहे, तो स्वतःची प्रतिमा पाहू इच्छितो आणि त्यानंतर तुम्ही काय करता तर, कुठेतरी जाता दुसरे बदल करता, स्वच्छता करता अथवा तुमच्या ध्यानातून ते ठीक बनविता की, ज्यामुळे आत्मा, तुमच्या आत्याने समाधान पावतो. श्रीकृष्णानी गीता अशी संदिग्ध पद्धतीने मांडली कारण तो फार हुशार होता. त्याला माहिती होते, मनुष्य कोठल्याही गोष्टी सरळपणे घेणार नाही. म्हणून ह्या पद्धतीने त्या पद्धतीने त्यांना सांगा, ज्यामुळे ते भोवताली धावतील आणि सरतेशेवटी सत्याकडे येतील. सत्य अगदीच सहज आहे.

सत्य फारच सोपे आहे. तुम्हास इकडे तिकडे जाण्याची गरज नाही. तुम्हाला सर्वकाळ डोक्यावर अथवा पायावर उभे राहण्याची आवश्यकता नाही. तुम्हास कोणत्याही प्रकारची तपस्या करावयाची नाही. काहीच नाही. फक्त तुम्ही बासरीप्रमाणे बना. पोकळ बना. सहजयोगींना ते कठिण नाही कारण, कुंडलिनिने अगोदरच तुम्हास पोकळ बनविले आहे. परंतु अजूनसुद्धा मला आढळते, लोक त्यांचे चित्त इकडे तिकडे वळवितात. अनेक लोकांनी मला सांगितले आहे, की त्यांचे प्रश्न काहीच न करता कसे सुटले. मी म्हटले, तुम्ही काय केले ते म्हणाले, "माताजी नाही, मी फक्त ते तुमच्या चरणांशी ठेवले" मी म्हटले, "खरोखरच, हो तर, आम्ही अडचणींच्या बाहेर उभे राहून त्याकडे पहात होतो आणि अडचणी नाहीशया झाल्या. अगदी अवघड असा प्रॉब्लेमसुद्धा सहज सोडविला जातो कारण तुमच्याकडे शक्त्या आहेत. तुमच्या शक्त्या खूप मोठ्या आहेत तुम्ही संत आहात नव्हे संतापेक्षाही खूप आहात कारण तुम्ही अशा पटकन उडून जाणाऱ्या (volatile) काळात जन्माला आला आहात. ह्याप्रमाणे समजा की तुमच्याकडे प्रकाश आहे आणि बाहेर अंधार आहे, तुम्ही काही शोधत आहात आणि एकदम त्यामध्ये जाता, परंतु समजा जर ती जागा गॅसने भरलेली असेल. तुम्ही प्रकाश आणता आणि सर्व काही प्रकाशित होऊन जाते. त्याच पद्धतीने तुमच्याकडे शक्त्या आहेत, परंतु ह्या मी, माझा, माझे या मूर्खपणातून बाहेर पडले पाहिजे. हे स्वीमिंग पुलप्रमाणे नाही की, उडी मारा आणि बाहेर या. हे अगदी वेगळ्या प्रकारची समज (understanding) आहे, की आपल्या मुळांनी (roots) वाढले पाहिजे आणि स्वतःमध्ये आपल्या मुळांना (roots) वाढविले पाहिजे. स्वतःमध्ये शोधून काढा, आपण किती क्षेत्र व्यापले आहे. आपल्या जीवनपद्धतीच्या कोणत्या क्षेत्रात या मुळांना आतमध्ये घेऊन जात आहोत. श्रीकृष्णाने सुद्धा म्हटले आहे, जीवनाच्या वृक्षाची मुळे आपल्या मेंदूत आहेत आणि ती खाली वाढतात हे समजून घेणे फारच आश्चर्यकारक आहे की मुळे मेंदूमध्ये वाढतात. याचा अर्थ म्हणजे तुमची स्वतःची वृद्धीच करुणेने आच्छादली आहे. ती करुणेशी अगदी एकरूप आहे. मी तुम्हाला एका संताची गोष्ट सांगितली आहे, जो गुजरातमधील एक देवतेकडे पाणी घेऊन जात होता. तेथे जाण्यासाठी पाण्याचे एक भांडे घेऊन एक महिनाभर चालत राहिला. ती देवता उंच अशा पर्वतावर होती. तो पर्वत पायथ्याशी पोहोचला तेथे त्याला एक गाढव तहानेमुळे मरताना दिसले. त्याने सर्व पाणी त्या गाढवाच्या घशात ओतले. जे लोक त्याच्याबरोबर होते ते म्हणाले," हे तू काय करतो आहेस, तू संपूर्ण रस्ता, हे स्वतःबरोबर वागविले आणि आता ते गाढवाला

का देत आहेस?" तो म्हणाला," तुम्हास माहिती नाही, परमेश्वर मला इथेच भेटण्यासाठी खाली आला आहे. त्याला मला वरती चढायचे कष्ट घेऊ द्यायचे नाहीत." या प्रकारची भावनांची अगदी सोपी जाण आणि मग इतरांचे प्रश्न तुम्ही सोडवू शकता, ते निकालात लावू शकता आणि ती व्यक्ती तुम्हाला सांगेल, की तुम्ही प्रश्न सोडविला आहे. तुम्हांस माहिती होणार नाही की, कसे काय तुम्ही प्रश्न सोडविला कारण प्रेम हीच शक्ती आहे. हे प्रेम पाहू शकेल. ते सर्व काही आहे. ते अगदी टी.व्ही प्रमाणे आहे. जर तुम्ही टेलिफोन पाहिला, तर टेलिफोनच आहे. तुम्ही कुठली गोष्ट पाहता तर ती शक्तीने करता. ती शक्ती प्रेमावरोबर नेहमीच तुमच्या आतमध्ये आहे. तुम्हास टेलिफोनची आवश्यकता नाही. संपूर्ण ब्रह्मडाचे सूक्ष्म ज्ञान तुमच्या चरणांशी आहे. फक्त तुम्हास कोणतीही गोष्ट करावी असेल, तर ती तुम्ही केलीच पाहिजे, फक्त तुमच्या व्हायब्रेशन्सने आता अनेक लोक म्हणतात, "माताजी, याला ठीक करा, त्याला ठीक करा." त्याची काही आवश्यकता नाही तुम्ही सर्वजण कोणालाही बरे करु शकता. परंतु तुम्ही त्या व्यक्तीस माझ्याकडे घेऊन येता. त्याची काही गरज नाही. तुम्हास इच्छा असेल तर तुम्ही कोणासही ठीक करू शकता. तुम्ही स्वतःच त्यांचे सर्व प्रॉब्लेम्स सोडवू शकता. एक छोटेसे बंधनच सोडवू शकते. परंतु त्यासाठी तुम्ही प्रेमाचा स्त्रोत असले पाहिजे. एकदा तुम्ही बंधन दिले की, हे शक्तिमान प्रेम ते हातात घेते. ठीक आहे मी ते काम करेन, परंतु तुम्हाला या सुंदर गोष्टीचे मास्टर, निपुण बनायला हवे परंतु प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे. हे इतर मास्टरस पेक्षा वेगळे आहे. इतर बाबीतील मास्टर लोक, दुसऱ्यावर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करतात, ते दुसऱ्यांना नष्ट करण्यासाठी वापरतात. परंतु प्रेमातील मास्टरी म्हणजे, तुम्हास परमेश्वरी प्रेम शक्तीशी तादाम्य कसे निर्माण करायचे हे माहिती असणे. आणि हे प्रेम केवळ शक्तिमानच नव्हे, तर सदैव कार्यरत आणि दक्ष असणारे इन्स्ट्रुमेंट (उपकरण) आहे, जे प्रत्येक गोष्ट अशा पद्धतीने कार्यान्वित करते की, तुम्ही आश्चर्यचकित व्हाल की हे कसे घडले आणि प्रत्येकाने हे पाहिले आहे. मला माहितीच, तुम्हास ते माहिती येईल. परंतु तुम्ही ते वापरत नाही. तुम्हास चैतन्य लहरींच्या जाणीवेत (vibratory awareness) असाववास हवे, आणि अगदी स्वतःलाच बंधन देऊन ते वापरले तर, ते तुम्हालाच स्वच्छ करेल. कल्पना करा तुमच्या हातात ही इतकी मोठी शक्ती आहे, तुम्हास हे संतुलन देणारी, हे प्रेम ही करुणा आणि संरक्षण देणारी तुम्ही ही इतरांस देऊ शकता. शिवाय आता तुम्ही परमेश्वराचे अविभाज्य भाग (part & parcel) बनला आहात. तुम्ही आता परमेश्वराच्या साम्राज्यात आहात. तुम्हास जे काही करायचे आहे, ते ही परमशक्ती करु शकते. तुम्हास हे सर्व सांगूनदेखील मला अजून काही वेळेला जाणवते, तुम्हाला आत्मविश्वास वाटत नाहीत. तुम्ही निराश होता. तुम्हास वाटते, हे कसे काय असू शकते? तुम्हाला स्वतःमध्ये विश्वास नाही. तुम्हाला स्वतःमध्ये श्रद्धा नाही. शिवाय असे अनेक लोक आहेत ज्यांना वाटते, आपण दुर्लक्षिले जात आहोत. त्यांच्या बाबतीत काही तरी घडले आहे एकदा एका स्त्रीने रडायला सुरुवात केली. मी म्हटले, "ती का रडते आहे?" ती म्हणाली, "माताजींनी माझ्याकडे पाहून स्मित केले नाही." कधी कधी अशा प्रकारची भावना येते की, सहजयोगामध्ये माताजींनी सतत तुमच्याशीच संबधित (Attached) राहिले पाहिजे. ती कोणाशीही चिकटू शकत नाही. लोक म्हणतात, तुम्ही या माणसाची काळजी घेतली पाहिजे कारण तो फार महत्त्वाचा आहे. मुळीच नाही. माझ्यासाठी तुम्ही फक्त माझे अविभक्त अंश आहात, बस! त्या पेक्षा काही नाही, म्हणून तुम्ही पाहता प्रत्येकाला हे कळले पाहिजे की, तुम्ही माझ्या हृदयाजवळ आहात, अगदी जवळ मला तुमचा फार अभिमान वाटतो. हा चमत्कारच घडला आहे, की तुम्ही लोकांनी सहजयोग स्वीकारला. म्हणून या गोष्टीवर सुद्धा लोक अडतात माताजी माझी किती काळजी घेतात आणि माझ्यासाठी काय करतात? समजा आता मी कोणाला म्हटले! "ठीक आहे, इथे बसू नैका, तिथे बसा." त्यांना वाईट वाटते तुम्ही कुठलीही गोष्ट करा, त्यांना वाईट वाटते. अशा प्रकारच्या व्यक्तीला प्रेमाची जाणीव नाही. तो आईचे प्रेम समजू शकत नाही.

जेव्हा तुम्ही गुरु असता, तेव्हा एक आई देखील असता तुम्हास स्वतःला आईप्रमाणे अभिव्यक्त करायला हवे. ती उदार आहे ती प्रेमळ आहे, ती क्षमा करते. ती आवश्यक असेल तेव्हा सुधारते देखील. परंतु तिच्या गोड पद्धतीने ज्यामुळे सुधारणा घडून येते, असा पद्धतीने नव्हे की, भांडण (rebellion) सुरु होईल. म्हणून आईची सर्व सुबुद्धी (wisdom) तुमच्यातही आहे. म्हणून प्लीज त्याचा उपयोग करण्याचा प्रयत्न करा. मला खात्री आहे. ते सर्व कार्यान्वित होईल आणि आपण सुंदर लोकांचा खूप मोठा समुह आहोत, जे सामान्यांपेक्षा काहीतरी वेगळे आहेत, जे खूप शांततेत आहेत आणि एकमेकांचा आनंद लुटतात.

परमेश्वराचे तुम्हाला अनंत आशिर्वाद !